UNIVERSAL LIBRARY
OU_196096
UNIVERSAL LIBRARY

॥ श्री ॥

# वैश्यवेदोक्तक्रियाविचारव्यवस्था

मूळग्रंथ शृंगेरीसंस्थान याचें

## महाराष्ट्र भाषांतर

---

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्येत्यादि-
पदांकित जगद्गुरु

**श्रीशंकराचार्य-संस्थान हंपी-विरूपाक्ष**

यांच्या आज्ञेनें

वे० शा० म० श्रीयज्ञेश्वरशास्त्री देवणीकर

यांनी केलें.

---

शके १८४८

---

किंमत १। रुपया.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ मंगलाचरण. | १ |
| २ सांप्रतपरिस्थिति | २ |
| ३ वैश्यपूर्वपक्ष | ६ |
| ४ कांहीं ब्राह्मणपक्षाचें वैश्याभावकथन | ८ |
| ५ ग्रंथकाराच्या सिद्धांतांत येणारे विषय | ११ |
| ६ ब्राह्मणपक्षाचें खंडन | १३ |
| ७ वैश्यत्वसिद्धि | १५ |
| ८ वैश्यांचें वेदोक्तकर्मखंडन | १९ |
| ९ पाराशरस्मृति कलीकरिताच म्हणणारा पक्ष | २१ |
| १० पाराशरस्मृति चारी युगाला समान असलेला सिद्धांत | २६ |
| ११ व्रात्यप्रकरण | २९ |
| १२ व्रात्यप्रायश्चित्तप्रकरण | ३४ |
| १३ वैश्यगोत्रप्रवरनिर्णय | ४९ |
| १४ अग्न्याधानसिद्धि | ५२ |
| १५ वेदोक्त कर्माबद्दल असलेल्या वैश्यांच्या आक्षेपाचें समाधान | ५७ |
| १६ स्वधर्मत्याग करून परधर्म स्वीकारल्याचें फलकथन | ५९ |
| १७ स्वधर्माबद्दल श्रीरामचंद्राकडून झालेल्या शंबूक शूद्राच्या शासनानंतर ब्राह्मणाच्या मृतपुत्राचें पुनरुज्जीवन | ६१ |
| १८ वैश्याबद्दल भास्कराचार्यांचा अवतार व वैश्याचारव्यवस्था | ६२ |
| १९ उपसंहार व वैश्यसमाधान | ६६ |
| २० ईशप्रार्थना | ६७ |

# प्रस्तावना.

सुज्ञ वाचक हो, हें जग धर्माच्या अश्रद्धेने दुःखसमुद्रांत दिवसेंदिवस किती बुडत आहे हे नवीन नसून अनादिकालापासूनच आहे. पण त्यांत विचार केल्यास खास हे दिसून येईल कीं, कृतोपकाराची कृतज्ञता न मानितां उलट कृतघ्नता मात्र दाखविण्याची ही जगाची पद्धत अपूर्व आहे. ज्यानें आपद्ग्रस्त जगास वारंवार सोडविले त्या धर्माची अश्रद्धा असणें आश्चर्य नव्हे काय? हाय! हाय! कोण ही शोचनीय दशा! असे असतांही अवतारी व साधुसंतांनीं मात्र जगाच्या कृतघ्नतेकडे दृष्टि न देतां आपल्या कर्तव्यास अनुसरून जगाच्या हिताविषयीं प्रयत्नाची शिकस्त केली. म्हणूनच 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती' ह्या साधूक्तीची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. ज्या अवतारी व साधुसंतांनीं आपल्या उज्ज्वलित वाक्प्रवाहाने दुर्वर्तन करणाऱ्या जगास सदुपदेश करून सन्मार्गास लाविलें असे अवतारिक व संत म्हणजे शंकराचार्य, मध्वाचार्य व रामानुजाचार्यादि आणि तुकाराममहाराज, ज्ञानेश्वरमहाराज वगैरे मंडळींनीं जगावर, अनंत उपकार करून आणि स्वतःचे यशःपटल दिगंतरीं प्रसिद्ध करून जणु काय हल्लींही आपण आहोत असें जगास दाखविले आहे. तीच परिस्थिति सध्यांही दिवसेंदिवस दृढ होऊन व परस्परांत दुही माजून हें जग किती खवळले आहे, हे सुज्ञ वाचक प्रांजलपणाने कबूल केल्यावांचून राहणार नाहींत. सद्यःस्थितीला दुहींचीं अनेक कारणें असलीं तरी मुख्य कारण, म्हणजे वेदोक्ताचे बंड. हे बंड प्रथम मराठा जातींत उत्पन्न होऊन त्यांत आर्यवैश्यांनीं तर विशेष भर घातली त्याचा परिणाम ब्राह्मणांवर होऊन मराठा व वैश्य ह्या उभयतांनीं आपल्या वेदोक्तकर्माविषयीं ब्राह्मणांस दुराग्रह केला आणि आपल्या विरुद्ध असलेल्या ब्राह्मणाशीं

व ब्राह्मणेतर यांमध्यें बरीच तुही माजून भावी परिणाम भयंकर होण्याचा प्रसंग आला, अशा वेळीं परमहंस परिव्राजकाचार्यादिपदांकित श्रीजगद्गुरु शंकराचार्य पीठ शृंगेरी ह्यांनीं २० वर्षांखालीं "वैश्यवेदोक्त क्रियाविचारव्यवस्था" या नांवाचें एक पुस्तक संस्कृतांत गद्यरूपानें लिहून प्रसिद्ध केले. या पुस्तकामध्यें ब्राह्मणपक्षानें कोठें चुकतें व वैश्यांचें काय म्हणणें आहे; याचा योग्य तो विचार करून वैश्यांचें समाधान उत्तम रीतीनें केलें; पण हें पुस्तक संस्कृत भाषेत असूनही संपूर्ण शंका आणि समाधान या दोन बाजूंनीं वाद-ग्रस्त होऊन दुर्बोध झाल्यानें जगांत जसें पुढें यावयास पाहिजे तसें येण्यास बरीच अडचण पडूं लागली. ही जगाच्या दुर्दैवाची गोष्ट आहे, असें कांहीं माझ्या स्नेही मंडळीच्या मनांत येऊन जेव्हां त्यांनीं-स्नेही मंडळींनीं--ह्या पुस्तकाचें मराठींत भाषांतर करविण्याकरितां मला दुराग्रहाची सूचना केली. तेव्हां त्याचें माझ्यावर एवढें वजन पडलें कीं, माझी योग्यता भाषांतर करण्याची नसली तरी नकार म्हणतां येईना ! अशा निरुपायास्तवच भाषांतर लिहिण्याचें धाडस केलें, तरी पण भाषा, विचार व भाषाशुद्धि ह्या दोन्हींबद्दल शक्य तेवढा प्रयत्न केला; पण प्रमादानें झालेल्या चुकांविषयीं विद्वान् लोक क्षमा करितील अशी पूर्ण आशा धरून ही अल्पप्रस्तावना श्रीशंकरचरणीं अर्पण करितों.



" शंभोर्मूर्तिश्चरति भुवने शंकराचार्यरूपा "

॥ श्रीरस्तु ॥

श्रीशृंगेरीजगद्गुरुसंस्थाने

# श्रुतिस्मृतिपुराणकल्पसूत्रसदाचारादि परिशीलनपुरस्सरं प्रकटीकृता वैश्यवेदोक्तक्रिया

# विचारव्यवस्था.

यस्य निश्वासितं वेदाः यो वेद्यौ वेदराशिभिः ॥ तं वंदे परमात्मानं दक्षिणामूर्तिमव्ययं ॥ यस्याः प्रसादमात्रेण वाग्विभूतिः प्रजायते ॥ तां वंदे भारतीं नित्यं सर्वेष्टार्थप्रदायिनीं ॥ श्रुतिधेनुरसद्ग्राहपीडिता भूत्कलौ यतः ॥ तस्याः पीडानिवृत्यर्थमुद्यमः क्रियतेऽधुना ॥

**भाषांतर**—श्रीगणपति, शारदा वै गुरु या त्रिवर्गीना नमस्कार असो. शृंगेरी संस्थानांत श्रुति, स्मृति, पुराण व कल्पसूत्र या सदाचारादि ग्रंथांचें परिशीलन करून, वैश्यवेदोक्तकर्मविचाराची व्यवस्था प्रसिद्ध केली.

**त्यापूर्वी मंगल श्लोकाचा अर्थः**—ज्याचे श्वास वेद आहेत, जो वेदानें कळणें योग्य आहे आणि जो नाशरहित आहे, अशा त्या दक्षिणामूर्ति परमात्म्याला नमस्कार करितों ॥ १ ॥ जिच्या प्रसादा-

नेच वागैश्वर्य प्राप्त होतें, त्या नित्य सर्व इष्ट वस्तु देणाऱ्या सरस्वतीला नमस्कार करितों ॥ २ ॥ ज्याकरितां श्रुतिरूपी गाय कलीमध्यें दुष्टांच्या निग्रहानें दुःखी झाली आहे, त्याकरितां हा उद्योग करितों.

**इह खलु कलियुगे त्रिवत्सरोन पंचसहस्र वर्षेषु गतेषु, धर्मोहिग्रसतेऽधर्मं ततः कृतमभूद्युगं ॥ अधर्मो- ग्रसते धर्मं ततः स्तिष्यः प्रवर्तते ॥ इति शास्त्ररीत्या धर्मे अधर्मेण ग्रस्यमाने सर्वेपि वर्णाः स्वस्वधर्मान् परित्यज्य यथाऽभिलषितं वर्तंते तत्र ब्राह्मणेष्वेव- स्ववर्णोचित धर्माननुतिष्ठंतः प्रत्यवाय शून्याः परि- शुद्धा ब्राह्मणाः विरलाः ॥**

**भाषांतर** — या कलियुगांत, तीन वर्षें कमी पांच हजार वर्षें गेलीं असतां, (धर्मोहि०) या शास्त्राप्रमाणें कृत युगांत, धर्म अधर्माचा नाश करितो; आणि अधर्म धर्मास ग्रासित असेल, तर कलीस प्रारंभ झाला म्हणून समजावें. वरील शास्त्रोक्तीने सांप्रत अधर्मानें धर्मास ग्रासिलें असतां, सर्वच वर्ण आपापले धर्म सोडून मनाप्रमाणें वागतात. त्यांत ब्राह्मणांमध्येंच स्ववर्णाला योग्य धर्माचरण करणारे, प्रायश्चितरहित शुद्ध असे ब्राह्मण थोडे आहेत.

**स्ववर्णोचित सकलधर्मानुष्ठानराहित्येऽपियथाशक्ति यथासंभवं धर्मानुष्ठातारः जातिमात्रोपजीविन एव बहुलाः अमार्गवर्तिनः प्रत्यवाययुक्ताः ॥**

**भाषांतर**—स्ववर्णाला योग्य असा संपूर्ण धर्म होत नसला तरी, शक्तीला अनुसरून जितके संभवतील तितकेच धर्म करणारे, दुर्मार्गानें (प्रायश्चित्तासह का असेनात), पण निव्वळ जातीनेंच उपजीविका करणारे, असे तरी ब्राह्मण पुष्कळ आहेत.

**अधार्मिकास्तु सर्वतः प्रबलाः ॥ क्षत्रियवैश्यशूद्र-वर्णेषु सूर्यचंद्रादिवंशीयाः योनिबीजाभ्यां परिशुद्धाः शास्त्रोक्तधर्मानुष्ठातारः वैश्याश्च इदानीं नोपलभ्यंत एव ॥**

**भाषांतर**—अधार्मिक (धर्म न करणारे ब्राह्मण तर) सर्व देशांत प्रबल (हजारों) आहेत. आतां क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या वर्णांमध्यें सूर्य-चंद्र-वंशांत उत्पन्न झालेले, ज्यांची 'योनि' शुद्ध आहे, आणि 'बीज'ही शुद्ध आहे असे, शास्त्रोक्त पद्धतीनें धर्माचरण करणारे वैश्य या वेळेस मुळींच मिळत नाहींत.

**शूद्रास्तु योनिबीजाभ्यां यथासंभवं परिशुद्ध-त्वेपि मुख्यवृत्त्याजीवनयुक्ताः स्वधर्मानुष्ठातारः विरला एव ॥**

**भाषांतर**—सांप्रत काळीं शुद्ध योनि व शुद्ध बीजापासून उत्पन्न झालेले शूद्र शुद्ध मानिले तरी, आपल्या मुख्य उप-जीविकेच्या साधनानें (स्वधर्मानें) वर्तन करणारे क्वचितच सांपडतात.

**एवं स्थिते इदानीं बहुकालादारभ्य वेदाध्ययन-वेदोक्तकर्मानुष्ठानशून्याः आपस्तंबादि प्रवरसूत्रोक्त गोत्रप्रवरादिशून्याः पौराणिकमंत्रैरेव षोडश कर्मा-ण्यनुतिष्ठंतः द्व्युत्तरशतसंख्याक प्राकृता नामवाचित गोत्रेष्वन्यतमगोत्रवंतः [कोमटी] इति प्राकृत-भाषया व्यवह्रियमाणाः वैश्या इति प्रतीति विषयाः प्राग्दक्षिणदेशेषु बहवो वर्तंते ॥**

**भाषांतर**—अशी परिस्थिति सांप्रत काळीं असतां, पुष्कळ दिवसांपासून वेदाध्ययन व वेदोक्तकर्म नसलेले आणि आप-स्तंबादि करून सूत्रांनीं सांगितलेल्या गोत्रप्रवरादिरहित, निव्वळ पौराणिक मंत्रांनीच षोडशकर्म करणार, व १०२ गोत्र तींही शास्त्रांत

नसलेली अगदीं मराठी भाषेंत गणलीं गेलेली आहेत--त्या गोत्रांत असलेले ( कोमटी लोक ), ज्यांचा व्यवहार जगांत वैश्य या नांवानें होतो, असे वैश्य लोक ( कोमटी लोक ) पूर्व व दक्षिण देशांत पुष्कळ आहेत.

**तेषु च प्रायशः वंशपारंपर्येण पूर्वाचारप्राप्त पौराणिकमंत्रैरेव षोडशकर्मण्याचरंतः देवब्राह्मण-पूजकाः श्रेयोवंतः बहवो वर्तंते ॥**

**भाषांतर**—त्यांमध्येंही बहुतकरून वंशपरंपरेनें पूर्वजापासून चालत असलेल्या पौराणिक मंत्रानेंच षोडशकर्म करणारे आणि देव-ब्राह्मणांची आराधना करून सुखी असणारे, कोमटी ( वैश्य लोक ) पुष्कळ आहेत.

**केचन वयं वैश्याः अस्माकं श्रुतिस्मृत्यादिभिः वेदोक्तमंत्रैः षोडशकर्माणि यागादिकर्माणिच विहितानि तान्यस्माभिः ब्राह्मणाः न कारयंतीत्याग्रहेण स्वयमुच्छृंखलास्संतः कतिचन ब्राह्मणान् धनादिभिर्वंचयित्वा स्ववशमानीय्य तद्द्वारा वैदिकमंत्रैः षोडशकर्माणि अत्यल्पकालमारभ्य कर्तुमुपचक्रमुः ॥**

**भाषांतर**—आम्ही वैश्य आहोंत. आम्हांस वेदानें आणि स्मृतीनें वेदोक्त मंत्रांनीं षोडशकर्मे आणि यज्ञयागादि कर्मे सांगितलीं असून ब्राह्मण लोक आमच्या हातून तीं करवीत नाहींत. म्हणून दुराग्रहानें (स्वतः) उच्छृंखल होऊन कित्येक ब्राह्मणांना धनाच्या आशेनें फसवून स्वतःच्या आधीन केलें, व त्या ब्राह्मणद्वारा वैश्यांनीं वैदिक मंत्रांनीं षोडश कर्मे करण्यास थोड्याच दिवसापासून सुरुवात केली.

तेषु कश्चन लक्ष्मीनृसिंहश्रेष्ठिनामकः गतसंवत्सरे अग्न्याधानमपि चकारेति किंवदंती श्रूयते ॥ एतद्विषयं माक्षिपंतो बहवो ब्राम्हणादयःएवमेभिरनुष्ठितं एतच्चशास्त्रीयं उत अशास्त्रीयमितिसंदिहानाः केचन स्वस्वमत्यनुसारेण यथासंभवं लेखनादिभि र्निर्णयं चक्रुः ॥

भाषांतर—त्यामध्यें कोणी एक (लक्ष्मीनृसिंह) कोमटी यानें गतवर्षीं अग्न्याधान (अग्निसिद्ध)ही केलें, म्हणून लोकवार्ता ऐकण्यांत आहे. याविषयीं (आधानाविषयी आक्षेप करणाऱ्या कित्येक मंडळींनीं, यानें (लक्ष्मी नृसिंह) हें काम (आधान) जें केलें, तें शास्त्रीय आहे कीं अशास्त्रीय आहे, याविषयीं संशय पावून आपापल्या बुद्धीला अनुसरून जसे संभवेल तसे लेख प्रसिद्ध करून निर्णय केला.

तथाप्युच्छृंखलाः तद्ब्राह्मणोक्तान्यनादृत्यस्वेच्छानुसारेण वर्तंते ॥ एतद्विषये निर्णयः कार्यः इति बहुजनकृतप्रार्थनानुरोधेन निर्णीयते अत्रेयं विप्रतिपत्तिः ॥ वंशपारंपर्येण पूर्वाचारागतं मार्गमुत्सृज्य कतिपय दिनमारभ्य स्वेच्छया वैदिकमंत्रैः वेदोक्तकर्माण्यनुतिष्ठंतो वैश्यंमन्याः कोमटीनामनः ये संति तैः एतद्वंश्यैः एतद्बंधुभिः एतज्जातीयैर्वावेदोक्त कर्माणि वैदिकमंत्रैः कर्तुं योग्यानि न वेति ॥ तत्र एतेषां वैश्यंमन्यानां वैदिकमंत्रैरेव वेदोक्तकर्माणि कर्तव्यानीत्यत्र सधकत्वेनाभिमताः युक्तयः प्रमाणानि च ॥

**भाषांतर**—तसें असतांही ( निर्णय केला असूनही ) उच्छृंखल झालेले वैश्य (कोमटी), ब्रह्मवृंदांनी निर्णय केलेल्या गोष्टीचा अनादर करून, स्वेच्छाचारानें वागणारे आहेत याकरितां ( याविषयी निर्णय करण्याकरितां ) पुष्कळ लोकांनी आम्हांस प्रार्थना केली. म्हणून वैश्य-वेदोक्त-कर्माबद्दल निर्णय करण्याचें आम्हीं योजिलें आहे. यामध्यें ( वेदोक्त कर्मामध्ये ) त्या वैश्य लोकांचा ( कोमटी लोकांचा ) पुढीलप्रमाणें गैरसमज झाला. तो असा:— प्रथम वैश्यांचा पूर्वपक्ष मांडतों. वंशपरंपरेनें पूर्वापार चालत असलेला मार्ग टाकून, कांही दिवसांपासून स्वेच्छाचारानें वैदिक मंत्रानें, वेदोक्त कर्म करणारे आणि स्वतःला वैश्य मानणारे जे कोमटी लोक आहेत, त्यांनीं व वैश्य कोमटीवंशीयांनी, त्यांच्या बंधूनीं अथवा त्या जातीयांनीं वेदोक्त कर्म वेदमंत्रांनीं करावें किंवा नाहीं अशी वाटाघाट करून ठरविलें की, स्वतःला वैश्य मानणाऱ्यांनी, वेदमंत्रांनींच ( वेदोक्त कर्म ) करावींत. याविषयी मान्य असलेल्या युक्त्या व प्रमाणें खालीं दाखविली आहेत:—

**१. वयं वैश्याः इति लोकप्रतीतिरस्ति ॥ एवमेव द्व्याधिकशतगोत्राणि वैश्यानामितिश्रीमुखादिकमपि केश्चिद्दृतमस्ति ॥अतो वयं वैश्या इत्यभिधानमेकं ॥ २ वैश्यानां तु वेदोक्त सकल कर्मणां वेदोक्तमंत्रैरनुष्ठानं च शास्त्रविहितं॥तथाहि ॥ विष्णुस्मृतिः॥ (स्वाध्यायो यजनं दानं पशूनां पालनं तथा ॥ कुशीदं कृषिवाणिज्यं वैश्यकर्माणि सप्त वै) याज्ञवल्क्यस्मृतौ ॥ ( ब्रह्मक्षत्रियविट्शूद्राः वर्णास्त्वाद्यास्त्रयो द्विजाः ॥ निषेकादि स्मशानाताः तेषां वै मंत्रतः क्रियाः ॥ ) इति एवमातर्यदग्रे जायंते द्वितीयं**

मौंजिबंधनात् ।। ब्राह्मणक्षत्रियविशस्तस्मादेते द्विजाः स्मृताः इति वैश्यानामपि मातृगर्भनिस्सरण मौंजि-बंधनात्मकोपाधिद्वयेन द्विजत्वसंभवात् अस्माकं वेदाधिकार इति ।। एवमापस्तंबेनापि धर्मप्रश्ने उक्तं ।। अशूद्राणामदुष्टकर्मणामुपायनं वेदाध्ययनमग्न्याधेय-मिति।। एवं तत्रैव वसंतेब्राह्मणमुपनयीत ग्रीष्मेराजन्यं शरदि वैश्यं आषोडशाद्ब्राह्मणस्यानात्ययआद्वाविशात् क्षत्रियस्य आचतुर्विंशाद्वैश्यस्य इत्यादि प्रमाणैः यवागूराजन्यस्यामिक्षा वैशस्य इत्यादिश्रुतिवाक्यैश्च वैदिककर्मसु वैश्यस्याधिकारदर्शनात् इति ।।इत्यादि प्रमाणैर्वादिनः वयं वैश्याः अस्माकं वेदोक्तमंत्रैः वेदोक्तकर्मकर्मणे अधिकारोस्तीति वदंति ।।

**भाषांतर**---आम्ही वैश्य म्हणून लोकप्रसिद्धि आहे. याप्रमाणें १०२ गोत्रांतर्भूत वैश्यांना म्हणून आम्हांस कित्येकांनीं श्रीमुखही दिलें आहे, हें एक प्रमाण, आमच्या वैश्यत्वाबद्दल. वैश्यांना सर्व कर्में वेदोक्त आहेत, म्हणून शास्त्रसिद्ध आहे तें येणेंप्रमाणें: विष्णुस्मृति सांगत आहे कीं, (स्वाध्यायो०) या श्लोकांत वैश्यांना वेदाध्ययन, याग, दान, पशुरक्षण, व्याज, बडी शेती, धंदा—व्यापार अशी सात प्रकारचीं कर्में सांगितलीं. तसेंच याज्ञवल्क्यस्मृतिही सांगते कीं, (ब्रह्मक्षत्रि०) ह्या श्लोकांत (त्रयो द्विजाः) म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांना गर्भाधानापासून अंत्येष्टीपर्यंत वेदोक्त क्रिया आहे. ह्याप्रमाणेंच (मातुर्यदग्रेजायंते०) ह्या श्लोकांत आईपासून एक उत्पत्ति व दुसरी उपनयन-संस्कारानें. या दोन उत्पत्तींनीं ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांना शास्त्रकारांनीं द्विजत्व म्हणजे दोन वेळीं

जन्मणें असें सिद्ध केलें आहे. या प्रमाणावरून आमचे वेदाधिकार सिद्ध आहेत. तसेंच आपस्तंब ऋषींनी देखील धर्म-प्रश्नांत सांगितलें कीं, ( अशूद्राणामदुष्टकर्मणां ) म्हणजे, शूद्र नसलेल्या, आणि वाईट कृति न करणाऱ्या ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रिवर्गांनी उपनयन, वेदाध्ययन व अग्निसिद्धि ठेवणें (अग्नि-होत्रि असणें ); असें सांगून तेच आपस्तंब ऋषि पुनः सांगतात कीं, ब्राह्मणांचें उपनयन वसंत ऋतूंत करावें, क्षत्रियांचें ग्रीष्म ऋतूंत आणि वैश्यांचें शरद्ऋतूमध्यें (आषोडशात्ब्राह्मणस्य) इत्यादिक प्रमाणांवरून ( योग्य कालीं उपनयन न झाल्यास ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांना क्रमानें सोळा, बावीस व चोवीस याप्रमाणें काल सांगितला. प्रत्यक्ष वेदही सांगतो कीं. ( यवागूराजन्यस्य० ), ( आमिक्षा वैश्यस्य), अनुव्रतामध्यें क्षत्रियांना यवागू म्हणजे पातळ भात खाण्यास सांगितलें; आणि वैश्यांस आमिक्षा म्हणजे तापलेल्या दुधांत टाकलेलें दही खाण्यास सांगितलें आहे. या वेद आणि स्मृति-वाक्यांवरून आम्हांस ( कोमटी वैश्यांस ) वेदोक्त कर्माबद्दल पूर्ण अधिकार आहे. असा पूर्वपक्ष सांप्रतच्या वैश्य ( कोमटी ) लोकांनीं मांडिला असतां, याचें समाधान ( पूर्वपक्षखंडन ) कांही ब्राह्मणांनीं पुढीलप्रमाणें केलें म्हणून ऐकिलें. तें असेः—

**पराशर माधवीये एकादशाध्याये ५० श्लोक०॥ [ युगे युगे च ये धर्मास्तत्र तत्र च ये द्विजाः ॥ तेषां निंदा न कर्तव्या युगरूपा हि ते द्विजाः ॥ ] इति वचनव्याख्यानसमये—**

**सायण माधवाचार्यैः क्षत्रियवैश्यजात्योश्चस्वरू-पेणोच्छिन्नत्वात् इति प्रतिपादितं ते न कलियुगे**

क्षत्रियवैश्यजात्योरेवाभावात्—इमे व्यवहर्तारो न वैश्याः एवं ब्राह्मणाः क्षत्रियाः वैश्याः शूद्रावर्णास्त्रयो द्विजाः॥ युगे युगे स्थिताःसर्वे कलावाद्यंतयोः स्थितिः इति वैश्यकमलाकरोक्त पुराणवचनेन ॥ एवं (नाधीयते कलौ वेदान्नयजंते द्विजातयः ॥ उत्सीदंति तथा चैव वैश्यैः सार्धं तु क्षत्रियः॥)इति मत्स्यपुराणवचनेन च वैश्याः कलौ नहि भवंति कुलादि युक्ताः येवा भवंति नहि तेषु वृषः कादिचित् (शूद्रादि वृत्तय इमे द्विजदेवनिंद्याः विप्रद्विषः परमदारुण बुद्धयश्च) इति ब्रह्मकैवर्तपुराणवचनेन च (नंदातं क्षत्रियकुलं वेदवैदिकसंयुतं भविष्याति ततः शूद्रप्रायं वैश्यकुलं तथा) इति अत्रिस्मृतिवचनेन कलौ वैश्य जातेरेवाभावात् ॥ प्रकृते व्यवहर्तारः कोमटीपदवाच्याः न वैश्याः ॥ एतैः पूर्वपाक्षिभिः उदाहृतवचनादिषु वैश्यानां वेदमंत्रैः वेदोक्त सकलकर्मकरणे अधिकारप्रदर्शनेऽपि एतेषां वैश्यत्वाभावेन तानि प्रमाणानि एतत्पराणि न भवंतीति एवं रीत्या परस्परं विवादस्य प्रवृतत्वात्—अस्मिन् विषये कथं निर्णय इत्यपेक्षायां निर्णीयते ॥

भाषांतर—पाराशरस्मृतीमध्यें ११ व्या अध्यायांतील ५० व्या श्लोकांत माधवाचार्यांनी सांगितलें कीं, (युगे युगे च ये०) प्रत्येक युगाचे ठिकाणीं जे धर्म आहेत आणि जे ब्राह्मण आहेत, त्यांची निंदा (ब्राह्मणनिंदा) करूं नये. कारण युगरूपीच ते ब्राह्मण आहेत. या श्लोकावर व्याख्या करितांना सायण माधवाचार्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे कीं, क्षत्रिय जाति आणि वैश्य जाति

क्षत्रियस्वरूपानें व वैश्यस्वरूपानें नष्ट झालेली आहे. या वचनावरून कलियुगांत क्षत्रिय आणि वैश्य नसल्यामुळें (व्यापार करणारे) हे वैश्य नव्हेत. याप्रमाणेंच वैश्यकमलाकरभट्टांनेंही हें पुराणवचन देऊन (ब्राह्मणाः) प्रत्येक युगांत चार वर्ण (ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य व शूद्र) राहतात. पण कलियुगांत मात्र ब्राह्मण आणि शूद्र हे दोनच वर्ण आहेत. असें स्पष्ट म्हटलें आहे. तसेंच (नाधीयते कलौ वेदान्० ) ह्या मत्स्यपुराणवचनावरूनही स्पष्ट होतें कीं, कलींत ब्राह्मण वेदाध्ययन करीत नाहीत, आणि क्षत्रिय जाति वैश्यांसह नष्ट होतील. यावरूनही कलींत वैश्य नाहींत, कदाचित् असले तरी वृष म्हणजे (वेदोक्त धर्म) वैश्यांत कधीही रहात नाहीं. तसेंच ( शूद्रादिवृत्तय० ) ह्या ब्रह्मकैवर्त पुराणानें तर असें सांगितलें कीं, वैश्य शूद्राचारानें आणि ब्राह्मणद्वेष करणारे, देवनिंदा करणारे व उग्र बुद्धीचे होतील. याप्रमाणेंच ( नंदातं०इत्यादिवरून व 'ततः शूद्रप्रायं वैश्यकुलं०') या अत्रिस्मृतीवरूनही कलीमध्यें वैश्य नाहींत. सांप्रत व्यापार करणारे, कोमटी नांवानें प्रसिद्ध असलेले वैश्य नव्हेत, कोमटी लोकांनीं असा पूर्वपक्ष करून जीं उदाहरणें दिलीं, तीं सर्व वैश्य लोकांना वेदोक्त कर्म करण्याबद्दल आहेत असें थोडा वेळ मानिलें तरी कोमटी वैश्य नव्हेत. तीं सर्व प्रमाणें (श्रुति-स्मृति-पुराणें) वैश्यापर म्हणवितात. परंतु कोमटी वैश्य नव्हेत. त्यांना ( कोमटी ) हीं वचनें लागू होत नाहींत, असा सिद्धांत करणारे कांहीं ब्राह्मण आणि पूर्वपक्ष करणारे कोमटी, याप्रमाणें या उभयतांचा (ब्राह्मण-कोमटी ) परस्पर वाद उत्पन्न झाला असतां, निर्णय कसा होईल अशी सर्वांनीं इच्छा दर्शविल्यावरून आम्ही आतां निर्णय करविण्याचें ठरविलें आहे. आतां येथून स्वतःच ग्रंथकार या

वादाचा निकाल ( निर्णय ) लावणार आहेत. यापुढें वाचकानें ग्रंथकाराचें मत समजावें.

माधवाचार्यैः पाराशरस्मृतौ ११ अध्याये [ युगे युगे च ये धर्माः तत्र तत्र च ये द्विजाः ॥ तेषां निंदा न कर्तव्या युगरूपाहि ते द्विजाः ॥ ] इति श्लोकव्याख्यानावसरे–क्षत्रियवैश्यजात्योः स्वरूपत एव उच्छिन्नत्वात् इत्युक्तमात्रेण वैश्यजातिरेव नास्तीत्यभिधानस्य अशक्यत्वात्–कलौ परिशुद्ध सजातीययोनिबीजाभ्यामुत्पन्नस्य शुद्धवैश्यवर्णस्याभावेऽपि यथासंभव वैश्यवर्णोऽस्त्येवेति गम्यमानत्वात्–॥

**भाषांतर**—पाराशरस्मृतीतील ११ व्या अध्यायांतील ५० व्या श्लोकाचा ( युगे युगे० ) अर्थ करतेवेळीं सायण माधवाचार्यांच्या ( क्षत्रियवैश्यजात्योःस्वरूप० ). या सांगण्यावरून क्षत्रिय–वैश्य जाति नाहीं म्हणणें योग्य नाहीं. कारण सायण माधवाचार्यांचा अभिप्राय मला असा वाटतो कीं, क्षत्रिय व वैश्य शुद्धयोनि आणि शुद्धजातीपासून उत्पन्न झाले तरी, कसा तरी वैश्यवर्ण आहेच.

तथाहि पाराशरस्मृतौ ११ अध्याये ५० श्लोक [ युगे युगे च ये धर्मास्तत्र तत्र च ये द्विजाः॥ तेषां निंदा न कर्तव्या युगरूपाहि ते द्विजाः ] अस्य व्याख्या ॥ अवतरणिका ननु उक्तरीत्या कलियुगे सर्वे अप्यभोज्यान्नाः अभक्ष्यभक्षणाश्च तथासत्येत द्विषयं प्रायश्चित्तं शास्त्रं निरर्थकं कृतेपि प्रायश्चित्ते पुनरपि तत्प्रवृत्तेः परिहर्तुमशक्यत्वात् प्रायश्चित्त

विधायिकायाः परिषदोऽसंभवाश्चनहि पापप्रवृत्तानां परिषत्वंयुक्तं स्वकर्मरतविप्राणामितितल्लक्षणात्— न चाभक्ष्यभक्षणादिभ्यः पापेभ्यो निवृत्तानां शिष्टानां परिषत्वंस्यादितिशंकनीयं तादृश पुरुषस्य कस्याप्यदृष्टचरत्वात अतः कलियुगे सर्वेषां निंद्यत्वादेव युगमुद्दिश्य प्रवृत्तस्यपराशर्यधर्मशास्त्रस्य निर्विषयत्वादित्याशंक्याह ॥ युगे युगे इति—॥ अस्याक्षरार्थः प्रथमाध्याये वर्णितः ॥—

भाषांतर—ग्रंथकार आपलें मत निश्चयपूर्वक सांगतात कीं, पाराशरस्मृतीमध्यें ११व्या अध्यायांतील ५०वा श्लोक (युगे युगे०) ह्या श्लोकाची व्याख्या करण्याच्या पूर्वीं सायण माधवाचार्य अवतरण (जें शास्त्र गद्यरूपानें किंवा पद्यरूपानें सांगितलें जातें त्याचा उद्देश थोडक्यांत सांगणें.) देत आहेत. कलीमध्यें अभोज्य भोजन करणारे आणि अभक्ष्य भक्षण करणारे सर्वच (लोक) आहेत. अशी परिस्थिति असतां, याविषयीं (अभक्ष्य भक्षण-अभोज्य भोजन करणारे) प्रायश्चित्त सांगणारें शास्त्र व्यर्थ मानावें लागतें. कारण प्रायश्चित्त केलें तरी पुनः पाप संभवतें! म्हणून प्रायश्चित्त सांगणारी सभा नसल्यामुळें पापाचा परिहार होणें दुर्लभ आहे. सर्वच अभक्ष्य भक्षण करणारे आणि अभोज्य भोजन करणारे असतील तर प्रायश्चित्त सांगणार कोण? इतक्याकरितां सर्व लोक [शिष्ट आणि अशिष्ट] निंदेला पात्र आहेत. म्हणून कलियुगाकरितांच माधवाचार्यांनीं केलेली पाराशरस्मृति यापूर्वीं दाखविलेल्या कारणामुळें निरर्थक होण्याची वेळ आली, म्हणून माधवाचार्य (युगे युगे०) हा श्लोक लिहितात. याचा अर्थ पाराशरस्मृतीच्या प्रथमाध्यायांत सांगितला आहे. आणि वैश्य-पूर्वपक्ष

खंडणाचे वेळींही येथें सांगितला; व यापुढेंही प्रसंग येईल तर सारांशरीतीनें (ज्या ठिकाणीं वादाचा संभव आहे) तेथें सांगतील.

अयमाशयः ॥ द्विविधाह्यधर्मप्रवृत्तिः ॥ युगप्रयुक्ताप्रमादादि प्रयुक्ता चेति तत्र युगप्रयुक्तायाः प्रवृत्तेरपरिहार्यत्वात्तन्निवृत्तये न पराशरस्योद्यमः ॥ यातु प्रमादालस्यादि प्रयुक्ता प्रवृत्तिः॥तत्र सावकाशं धर्मशास्त्रं तद्यथाध्ययनविधिस्तावत् अर्थज्ञानपर्यंतं सागं वेदमाचष्टे न च कलौ युगे तादृशं विप्रं कंचिदुपलभामहे तथा ब्रह्मचर्यादि प्रकरणे तदाश्रमधर्माः अध्ययनधर्माश्च सहस्रशः स्मर्यंते नच तान् सर्वान् यथावदनुतिष्ठन्माणवकः कोप्युपलभ्यते॥

**भाषांतर**—माधवाचार्यांचा ( पाराशरस्मृतिकर्त्यांचा ) अभिप्राय असा आहे की, अधर्मास दोन कारणें आहेत. युगधर्मानें होणारा एक अधर्म आणि दुसरा प्रमादानें होणारा. त्यांत युगधर्मानें होणारा अधर्म अपरिहार्य असल्यामुळें ( युगधर्मानें होणारा अधर्म) त्याचा परिहार करण्याकरितां पाराशरस्मृतीचा उद्योग नाही. प्रमादानें ( उन्मत्तपणानें ) होणाऱ्या अधर्माच्या परिहारास्तव धर्मशास्त्राची प्रवृत्ति आहे. ती अशी:-सांग वेदाध्ययन अर्थज्ञानापर्यंत आहे; पण कलियुगांत असा एकही ब्राह्मण मिळत नाहीं कीं, जो अर्थज्ञानापर्यंत षडंग वेदाध्ययन करणारा आहे. म्हणजे पूर्वीचें वेदाध्ययन अर्थासह होतें. तसेंच ब्रह्मचर्यादि प्रकरणांकडे वळलें, तर आश्रमधर्म आणि अध्ययनधर्म हजारों आहेत. परंतु या कलींत सशास्त्रपद्धतीनें ब्रह्मचर्यादि आश्रम सांभाळणारा आणि सशास्त्र वेदाध्ययन करणारा एकही मुलगा ( उपनयन झालेला ) मिळत नाहीं.

यदाऽध्यनस्येदृशीगतिःतदा कैव कथा सांगकृत्स्न वेदार्थानुष्ठानस्य–तथा सति शास्त्रीय मुख्य ब्राह्मण्योपेतस्य कस्याप्यभावात् ॥ क्षत्रियवैश्यजात्योश्वस्वरूपेणोच्छिन्नत्वात् शुश्रूषयितव्यानां द्विजानामसंभवे–तच्छुश्रुषकस्य मुख्यस्य शूद्रस्यात्यंतमनाशंकनीयत्वात्–॥

**भाषांतर**—जर अध्ययनाची ही स्थिति आहे, तर षडंग वेदार्थ समजून वैदिक कर्म न करणाऱ्यांची कथा काय?

**तात्पर्य**—शास्त्रीय पद्धतीचे ब्राह्मण दुर्लभ आहेत. क्षत्रिय व वैश्य तर स्वरूपतः नष्टच आहेत. सेवा करून घेणारे (सशास्त्र) द्विज (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य) जर नाहीत, तर ब्राह्मणादि वर्णांची सेवा करणारे (सशास्त्र) शूद्रही नाहींत असें म्हणावें लागतें.

किं चातुर्वर्ण्यमुद्दिश्य प्रवृत्तं धर्मशास्त्रं स्वरूपेणैवलुप्यतां किंवा मुख्यासंभवेऽपि यथासंभवं चातुर्वर्ण्यमाश्रित्य धर्मशास्त्रं प्रवर्ततामितिमीमांसायां–स्वरूपलोपाद्वरं यथासंभवानुष्ठानमित्याभिप्रेत्य युगप्रयुक्तां सर्वैरप्यवर्जनीय्यां अधर्मप्रवृत्तिमदोषत्वेनाभ्युपगम्य तेषां निंदानकर्तव्येत्युक्तं ततस्संभाविताध्यनाद्युपेतायां शक्यायां धर्मप्रवृत्तौ प्रमादालस्यादिरहितानां परिषत्वं कुतो न स्यात्–॥

**भाषांतर**—ही गोष्ट सिद्ध झाली कीं, सशास्त्र पद्धतीचे वर्ण (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र) कोणतेच नाहीत. म्हणून चारी वर्णांना उद्देशून असलेलें धर्मशास्त्र व्यर्थ मानावें किंवा कशाही रीतीनें (शास्त्राशास्त्रानें) वागणारे चार वर्ण (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र) आहेत;

म्हणून सर्व वर्णांना उद्देशून धर्मशास्त्र चालूं असावें. असा विचार केला असतां, अगदीं धर्मशास्त्राचा लोप केल्यापेक्षां युगमानाप्रमाणें चालत असलेल्या चारी वर्णांबद्दल नियमन ( प्रतिबंध ) करणें शास्त्राचें योग्य कर्तव्य आहे. हेंच मत योग्य म्हणून युगमानाप्रमाणें सर्वांकडून होत असलेली अधर्मप्रवृत्ति दोषरहित मानूनच पाराशरकर्त्यांनीं युगरूपी ब्राह्मणांची निंदा करण्याचा (युगे युगे च० ) या श्लोकानें निषेध केला. अशी मीमांसा ( विचार ) ठरली असतां युगमानाप्रमाणें वेदाध्ययनादि सकल कर्म चालूं होणें जर शक्य आहे, तर विचारदृष्टीनें चालणाऱ्या, आलस्य नसणाऱ्या लोकांची सभा कां होणार नाही ?

कृतप्रायश्चित्तस्य पुनः प्रमादालस्यादि वर्जनस्य शक्यत्वात् प्रायश्चित्तशास्त्रं च सार्थकमिति ॥ एवं पाराशरस्मृतिव्याख्यानावसरे माधवाचार्यैरुक्तत्वेन-यथासंभव चातुर्वर्ण्यस्यांगिकृतत्वात्-तर्हि क्षत्रिय वैश्यजात्योःस्वरूपेणोच्छिन्नत्वादिति वाक्यस्य एवं [ ब्राह्मणाःक्षत्रियाःवैश्याशूद्राः वर्णास्त्रयोद्विजाः॥ युगे युगे स्थिताः सर्वे कलावाद्यंतयोः स्थितिः ] इति-वैश्यक्रमःशंकरोक्तवचनस्यच का गतिरितिचेद्वदामः॥

**भाषांतर**--सभासदांनी दोषी मनुष्याची चिकित्सा करून प्रायश्चित्त दिल्यानंतर प्रायश्चित्त घेतलेला मनुष्य सभ्य आणि विचारी असेल तर पुनः आळस वगैरेंनी होणारा अधर्म करणार नाहीं. प्रायश्चित्त म्हणजे शास्त्रीय दंड असें होईल तर प्रायश्चित्त सांगणारे व्यर्थ होत नाहीत. म्हणूनच पाराशरस्मृतीची व्याख्या करतेवेळीं सायण माधवाचार्यांनीं कलींत ही चारी वर्ण आहेत, म्हणून मान्य केलें. या वेळेस वाचकांनीं अवश्य लक्ष

ठेवावें कीं, यापूर्वीं (स्वरूपेण०) या वाक्यावरून कांहीं ब्राह्मणांनीं मुळींच क्षत्रिय व वैश्य नाहींत, असें सांगितलें होतें; पण या ग्रंथकारांनीं त्याच ( स्वरूपेणोऽच्छिन्नत्वात् ) या वाक्यानें क्षत्रिय, व वैश्य आहेत असा सिद्धांत केला. वाद इतकाच होता कीं, ( स्वरूपेण ) याचा अर्थ, ग्रंथकारांनीं यथाशास्त्र वैश्य नाहींत, पण आचार न करणारे वैश्य आहेत.—कित्येकांनीं ( वैश्यखंडन करणाऱ्यांनीं) स्वरूप शब्दाचा अर्थ मुळींच नाहीं—असा केला होता. यांत कोणाचें खरें असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. विचार करून सूक्ष्म दृष्टीनें पूर्वापर भापातर पाहिलें तर ग्रंथकर्त्याचें म्हणणें खरें आहे, असें सुज्ञ वाचकांच्या लक्षात स्पष्ट येण्यासारखें आहे. ग्रंथकारानें कलीत चारही वर्ण आहेत असें मान्य केल्यावर (ब्राह्मणाः) यापासून ते ( कलावाद्यंतयोः स्थितिः ) हें वैश्यकमलाकरभट्टानें पुराणांतरवचन दाखवून कलींत क्षत्रिय आणि वैश्य नाहींत म्हणून जें वाक्य दिलें, त्या वाक्याची योजना काय, असा प्रश्न मनांत आणून त्याचें उत्तर ग्रंथकार सांगतात; तें असें:—

क्षत्रियवैश्यजात्योःस्वरूपत एवोच्छिन्नत्वादित्यस्य धर्मशास्त्रविहित वेदाध्ययनवेदविहितयज्ञादि कर्मकर्तृत्व विशिष्ट परिशुद्धजात्युच्छेदपरत्वस्यैव स्वरूपत इति पदस्वारस्येन कल्पनीयत्वात्॥ एवं आद्यतयोः स्थितिरित्यास्यापि जात्या परिशुद्धयोः आद्यंतयोः स्थितिरित्यर्थकत्वं बोध्यमिति० ॥ अत एव नाधीयंते कलौ वेदान्न यजंते द्विजातयः ॥ उत्सीदंति तथा चैव वैश्यैः सार्कंतु क्षत्रियाः॥ इति मत्स्य पुराणवचनेन एवं वैश्याः कलौनहि भवंति कुलादि युक्ताः ये वा भवंति नहि तेषु वृषः कदाचित्—॥

**शूद्रादिवृत्तय इमे द्विजदेवनिंद्याः विप्रद्विषः परम दारुण बुद्धयश्च ॥ एवं नंदांतं क्षात्रियकुलं वेदवैदिक-संयुतं–भविष्यति ततः शूद्रप्रायं वैश्यकुलं तथेति पूर्वोक्तब्राह्मणैरुदाहृतवचनसमूहेन च परिशुद्धकुल वेदवेदोक्तकर्मरहित यथासंभव वैश्यकुल सत्वस्यांगी कृतप्रायत्वात् एतद्व च समानार्थकत्वसंपत्त्यर्थं क्षात्रिय-वैश्यजात्योः स्वरूपेणोच्छिन्नत्वादिति माधवा-चार्यवाक्यस्यापि कृतत्रेतादापारादिषु वर्तमान परि-शुद्ध जात्युच्छेदपरत्वस्यैव वर्णनीयत्वात् ॥ एवं च इदानीं सर्वथा वैश्यजातिरेव नास्तीति वक्तुं न शक्यत इत्यवश्यमुपगंतव्यं ॥**

**भाषांतर** –( क्षात्रियवैश्यस्वरूपेणोच्छि० ) याचा अर्थ असा केला पाहिजे कीं, धर्मशास्त्रादिकांनीं सांगितल्याप्रमाणें वेदाध्ययन करणारे आणि वेदोक्त कर्म करणारे, शुद्ध जातीनें असलेले क्षत्रिय व वैश्य नष्ट झाले ! ( कलावाद्यंतयोः स्थितिः ) याचाही अर्थ जातीनें परिशुद्ध क्षत्रिय व वैश्य कलीत नाहींत असाच केला पाहिजे. म्हणूनच ( नाधीयंते० ) यापासून ( वैश्यैः साकंतु क्षत्रियाः ) ह्या मत्स्यपुराणानेंही कलियुगांत वेदोक्त कर्माला वैश्य अधिकारी नाहींत. जे कोणी कुलपरंपरेनें ( वैश्य ) आहेत, त्यांमध्यें वेदोक्तधर्म केव्हांही नाहीं. यापूर्वीं कित्येक ब्राह्मण मंडळींनीं, वैश्यांच्या वेदोक्त कर्माचें खंडन करते वेळीं प्रमाण म्हणून ( शूद्रादिवृत्तय० ) हा श्लोक दिला आहे. नंदराजापर्यंत क्षत्रियवंश वैदिक कर्म (वेदोक्त कर्म) करणारा आहे. त्यानंतर वैश्यवंश शूद्राचारप्रमाणें राहील; याचाही स्पष्ट अर्थ असा आहे कीं, शुद्ध कुलाचे वैश्य नाहींत, पण नाममात्रानें वैश्य आहेत, असाच होतो. हीं सर्व वचनें ( खंडन–श्लोकवचनें ) समानार्थी

करण्याकरितां (या वचनांचा विरोध येऊं नये म्हणून) सायण माधवाचार्यांनीं ( क्षत्रियवैश्यजात्योः स्वरूपेणोच्छिन्नत्वात्०) याचा अर्थ, कृतत्रेतद्वापार (हीं तीन युगें आहेत.) यांमध्यें परिशुद्ध जातीनें असलेली, क्षत्रिय व वैश्य जाति कलियुगांत शुद्ध नाहीं म्हणून स्पष्ट सांगितला. पण वैश्य नाहींत म्हणून म्हणत नाहींत. तर कलींत वैश्य आहेत असाच अभिप्राय आहे. (साय. माध. अचा. आहे.)

ननु यथासंभव वैश्यजातिर्वा इदानीं कलियुगेपि यद्यंगीक्रियते तदा वैश्यस्य वेदाध्ययनं वैदिकमंत्रैः षोडश कर्माणि यजनादिकं च स्यात् ॥ तथाहि ॥ भारते कर्णपर्वणि—॥ अतस्त्वां कथये कर्णानदर्शनमिदं पुनः ॥ वैश्यः किल समुद्रांते प्रभूतधनधान्यवान् ॥ यज्वादानपतिः क्षांतः स्वकर्मस्थो वरुशुचिः इत्यादि वचने वैश्यस्य यज्वा इति विशेषणस्य सत्वात यागाधिकारित्वं प्राप्नोति ॥ एवं आपस्तंब धर्मसूत्रे स्वकर्म ब्राह्मणस्य अध्ययनमध्यापनं यज्ञोयाजनं दानंप्रतिग्रहणं दायाद्यंशिलोंछ अन्यद्वापरिग्रहीतमेतान्येव क्षत्रियस्य अध्यापनयाजनप्रतिग्रहणानीति परिहाप्यदंडयुद्धादिकानि ॥ क्षत्रियवद्वैश्यस्यदंडयुद्धवर्जं कृषिगोरक्षणवाणिज्यादिकमित्यनेन वैश्यस्यापि यजनाध्ययनदानानामुक्तत्वात् वेदयजनादिष्वधिकारः प्राप्नोति ॥ एवं पाराशरस्मृतौ वैश्यं वा क्षत्रियं वापि निर्दोषं योभिपातयेत् सोतिकृच्छ्रद्वयं कुर्यात् गोविंशद्दक्षिणां ददत् ॥ इति पाराशरस्मृति षष्ठाध्याये श्लोक १७ ॥ व्याख्यानावसरे माधवाचार्यैः ॥ हत्वासवनिनं वैश्यं राजन्यमपि

दीक्षितं ॥ हत्वातु ब्रह्महत्यैव तथा त्रेयां च ब्राह्मणी- मिति ॥ यमस्मृतिवचनस्य ॥ एवं यागस्थं क्षत्रियं हत्वा वैश्यं हत्वातु यागगमिति–॥ एतदेव व्रतं कुर्यात् आत्रेयीविनिधातुकः ॥ इति शंखवचनस्य च उदा- हृतत्वात्

तयोर्वचनयोस्सवनिनं वैश्यं ॥ वैश्यं हत्वातु यागगमिति वाक्य सत्वात् वैश्यस्यापि यागाधि- कारोऽस्त्येव–एवं पाराशरस्मृतौ द्वितीयाध्याये जप्यं देवार्चनं होमं स्वाध्यायं चैवमभ्यसेत्–॥ एकद्वित्रि- चतुर्विप्रान् भोजयेत् स्नातकान् द्विज इति द्विती- याध्याय पंचम श्लोके द्विजस्य होम स्वाध्याय पदाभ्यां अग्निहोत्राध्ययनयो प्राप्त्वात ब्राह्मण- क्षत्रियविशांत्रयाणामपि द्विजत्वात वैश्यस्यापि याग वेदाध्ययनाधिकारः सिध्यतीति चेत्–एतत्प्रमाण समुदां यस्य कृतत्रेताद्वापारयुगस्थ वेदाधिकारविशिष्ट योनिबीजाभ्या परिशुद्धसद्वैश्यजातीयपरत्वात्– ॥ न हीदानीं तनलुप्तवेदाधिकार वैश्यपरत्वं वक्तुं शक्यते ॥

भाषांतर—यथासंभव (सशास्त्र नमलेली) वैश्यजाति या कलि- युगांत आहे, असें आपलें (ग्रंथकाराचें) मत जर आहे, तर वैश्यांला वेदाचें अध्ययन आणि यज्ञादिक वेदोक्त षोडश कर्मे असले पाहिजे. कारण भारतापैकीं कर्णपर्वामध्यें (अतस्त्वां) या श्लोकानें यज्वा आणि दानपति असे वैश्याला विशेषण दिलें आहे ह्यावरून वैश्यांना यज्ञाचा अधिकार आहे. याप्रमाणेंच आपस्तंब धर्मसूत्रांत ब्राह्मणांला अध्ययन, अध्यापन, यज्ञ करणें आणि दुसऱ्याच्या हातून यज्ञ करविणें, दान,

प्रतिग्रह (दुसऱ्यापासून दान घेणें) व शिलोंछवृत्ति, (बाजारांत विक्री होऊन खालीं पडलेले दाणे वेंचून आणणें) हीं कर्मे सांगितलीं. क्षत्रियांना अध्यापन (पढविणें) प्रतिग्रह, यज्ञ करविणें व शिलोंछ वृत्ति, यांवांचून अवशिष्ट सर्व आणि युद्ध व दंड इत्यादि कर्मे सांगितली. वैश्यांना युद्ध व दंड हे वर्ज्य करून क्षत्रियांप्रमाणेंच कर्म असून शेतीचा धंदा, व्यापार व गोरक्षण हे विशेष सांगितले. ह्यावरूनही वैश्यांना यज्ञ, वेदाध्ययन व दान यांचा अधिकार आहे. पाराशरस्मृतींतही (वैश्यं वा क्षत्रि० अध्याय ६ श्लोक १७) निर्दोषी क्षत्रियाचा आणि दोषरहित वैश्याचा घात केला तर १२० गाईंची किंमत दक्षिणा द्यावी व कृच्छ्र करावें. सायणमाधवाचार्यांनीं वरील श्लोकाची व्याख्या करतेवेळीं, शंखस्मृतीचीं आणि यमस्मृतीचीं प्रमाणें देऊन यज्ञ-दीक्षा धारण करणाऱ्या क्षत्रियांची आणि यज्ञदीक्षा धारण करणाऱ्या वैश्यांची हत्त्या केली तर ब्रह्महत्त्या (ब्राह्मणाला जीवासह मारणें) उत्पन्न होते. या प्रमाणावरूनही वैश्यांस पाराशरस्मृतीनेंही यज्ञाचा अधिकार सांगितला आहे. तसेंच, पाराशरस्मृति अध्याय २ श्लोक ९ वा यांत द्विजांनी होम आणि देवपूजा करून वेदाध्ययन करावें, असा विधि सांगितला. ब्राह्म, क्षत्रि व वैश्य या तीन वर्णांला द्विज म्हणतात. या प्रमाणानेंही वैश्यांना अग्निहोत्र आणि वेदाध्ययन सांगितलें. या सर्व प्रमाणांवरून कलियुगांतही वैश्यांना वेदाधिकार आहे, असें सिद्ध होतें. म्हणून तुम्ही (पूर्वपक्ष करणारे लोक) शंका घेऊ नका. कारण याचें उत्तर तुम्हांस सांगतों. (हें म्हणणें ग्रंथकारांचें आहे.) वरील सर्व प्रमाणें, (वैश्याधिकाराबद्दल) कृत, त्रेता, द्वापार-युगांत असलेल्या—ज्यांची योनि आणि बीज शुद्ध आहे—अशा **वैश्यांबद्दल आहेत. या वेळेस ( कलियुगांत ) असलेल्या वैश्यांबद्दल हीं प्रमाणें मानतां येत नाहींत.**

यथा चेदानीं तनकोमटीपदवाच्य वैश्याना न वेदाध्ययनयागाधिकारः तथा अनुपदमेवमेव स्फुटी भविष्यति–न च कलियुगमात्र धर्मबोधक पाराशरस्मृतिव्याख्यानावसरोक्तत्वात् पूर्वोक्त यमशंखवचनानां कथं युगांतरपरत्वमुच्यत इति वाच्यं ॥ यमशंखादि स्मृतीनां चतुर्युगसाधारण्यात् ॥ न च तथापि माधवाचार्यैः कलियुगमात्रोपयोगि पाराशरस्मृति याख्यानावसरे पठनमयुक्तं किं च कलियुगमात्रोपयोगि मूलभूत पाराशरस्मृतावेव द्वितीयाध्याये (जप्यं देवार्चनं होमं स्वाध्यायं चैवमभ्यसेत् ॥ एकद्वित्रिचतुर्विप्रान् भोजयेत्स्नातकान् द्विजः ) इति पंचम श्लोके ब्राह्मणक्षात्रियवैश्य साधारणद्विजपदवाच्यानां वैश्यानामपि होमस्वाध्याययोः प्राप्तिरस्तीति इदानीं तन वैश्यपदवाच्यानामपि वेदाधिकारोऽस्त्यवेति वाच्यं ॥

**भाषांतर**—प्रस्तुत कोमटी या नांवानें प्रसिद्ध असलेल्या वैश्यांना वेदाध्ययनाचा व यज्ञ करण्याचा अधिकार नाही, हें थोड्या वेळांतच स्पष्ट कळणार आहे. कलियुगांतील धर्माचार सांगण्याकरितांच केलेल्या पाराशरस्मृतीच्या प्रमाणाबरोबर यमस्मृतीचीं प्रमाणें दिलीं, म्हणून शंखस्मृति व यमस्मृति अन्य युगांकरितां आहे, कलियुगाकरितां नाहीं, असें मुळींच म्हणूं नका. कारण शंख व यमस्मृति चारी युगांला समान आहेत. शंखादि स्मृत्या सर्व युगाला समान मानिल्या तरी, खास कलीकरितांच असलेल्या पाराशरस्मृतीची व्याख्या करते वेळीं शंखादिक स्मृतीची व्याख्या माधवाचार्यांना करावयाला नको आहे. जर शंखादि स्मृतींचीं प्रमाणें मानलीं, तर

कलींतल्याच धर्माला उपयोगी असलेल्या पाराशरस्मृतीच्या दुसऱ्या अध्यायांतील पांचव्या श्लोकांत द्विजांला वेदाध्ययन सांगितलें, द्विज हा शब्द तिन्ही वर्णांला समान असून, वैश्यालाही द्विज शब्द जर आहे, तर हल्लींच्या वैश्यांनाही वेदाधिकार असावयालाच पाहिजे.

एतत्पाराशरस्मृतेः न कलिधर्म मात्र बोधकत्वं किंतु चतुर्युगसाधारण धर्मबोधकत्वमपि स्वीकर्तव्यं अन्यथा ( अश्वालंबं गवालंबं संन्यासं पलपैतृकं देवरेण सुतोत्पत्तिं कलौ पंच विवर्जयेत्) नराश्वमेधौ मेध्यं च कलौ वर्ज्यौ द्विजातिभिः ॥ व्रत स्वाध्याय सापेक्षमघसंकोचनं तथा ॥ प्रायश्चित्तविधानं च विप्राणांमरणांतकं ॥ एतानि लोकगुप्त्यर्थं कलेरादौ महात्मभिः ॥ निवर्तितानि कर्माणि व्यवस्थापूर्वकं बुधैः समयश्चापि साधूनां प्रमाणं वेदवद्भवेत् ॥ इत्यादिना अश्वमेधाघसंकोचन मरणांतिक प्रायश्चित्त विधानानां कलिवर्ज्यत्वेन परिगणितत्वापि पाराशर-मुनिवरैः पाराशरस्मृतावेव सुरापानं सकृत्कृत्वा अग्निवर्णां सुरां पिबेत्- ॥ सपातयदथात्मानं इहलोकेपरत्रच ॥ एवं अपहृत्य सुवर्णंतु ब्राह्मणस्य ततः स्वयं ॥ गच्छेन्मुसलमादाय राजानं स्ववधा-यतु ॥ ततः शुद्धिमवाप्नोति राज्ञासौ मुक्त एव तु॥ कामतस्तु कृतं यस्यात् नान्यथा वधमर्हतीत्या-दिना प्राणांतिक दंडस्य प्रायश्चित्ते विधानात् ॥ एवं पाराशरस्मृतौ द्वादशाध्याये ब्रह्महत्याप्रायश्चित्त-प्रकरणे यजेत वाश्वमेधेन राजातु पृथ्वीपतिरितिराज्ञः ब्रह्महत्याप्रायश्चित्तत्वेन कलिवर्ज्यस्यापि अश्वमेध-

**यागस्य विवक्षणात् ॥ एवं पाराशरस्मृतौ तृतीयाध्याये ॥ ९ श्लोके ॥ एकाहाच्छुध्यते विप्रो योऽग्निर्वेदसमन्वितः॥त्र्यहात्केवल वेदस्तु विहीनोदशभिर्दिनैः॥ इत्यादिना कलिवर्जस्याघसंकोचस्यापि विधानात् पाराशरस्मृतेः युगांतरधर्मबोधकताप्यस्तीत्येव वक्तव्यत्वेन इतरशास्त्रनिषिद्धत्वेपि पाराशरस्मृत्युक्तास्सर्वेपि धर्माः कलावप्यनुष्ठेया इति न नियमः ॥ किंतु यावतामितरशास्त्रलौकिकशिष्टाचारादिभिर्निषेधो न श्रूयते तेषामेव ॥**

**भाषांतर**—कलियुगाकरितांच पाराशरस्मृति आहे असें म्हणणाऱ्यांचा आक्षेप ग्रंथकार दूर करणार आहेत. ही पाराशरस्मृति कलियुगाकरितांच नसून कृतत्रेतादि चारी युगांना समान आहे, असें जर न मानिलें तर मोठी अडचण येणार आहे. ती ही पहाः— (अश्वालंबं०) अश्वमेधयज्ञ आणि गोहत्या ज्यांत आहे असा एक यज्ञ, त्रिदंड-संन्यास (संन्यासदीक्षा घेऊन पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारणें), श्राद्धास मांसभोजन, दिरापासून संतानप्राप्ति वगैरे गोष्टी कलियुगांत निषेध करून, ब्रह्महत्याप्रायश्चितप्रकरणांत ब्रह्महत्या करणाऱ्या राजानें आपल्या शुद्धीकरितां अश्वमेध याग करावा, असा विधि पाराशरस्मृतीनें बाराव्या अध्यायांत सांगितला. जर पाराशरस्मृति कलियुगाकरितांच असेल, तर कलींत निषेध केलेला अश्वमेध याग मुळींच सांगितला नसता. यावरून पाराशरस्मृति चारी युगांला समान आहे. तात्पर्य हेंच कीं, पाराशरस्मृति अन्य युगाचाही धर्माचार सांगते; पण तो धर्माचार इतर शास्त्रांनी सांगितला नसेल तर. म्हणून पाराशरस्मृतीनें सांगितलेले सर्व धर्म कलींतही करावेत असा नियम नाहीं.

किं च जप्यं देवार्चनं होमं स्वाध्यायं चैवमभ्यसेत्॥ एकद्वित्रिचतुर्विप्रान् स्नातकान् भोजयेत् द्विज । इति पाराशरस्मृतौ द्वितीयाध्याये ५ श्लोकगत द्विज-शब्दस्य ब्राह्मणमात्र परत्वमेव वक्तव्यं ।' तथाहि ॥ द्वितीयाध्याये अतःपरं गृहस्थस्य कर्माचारं कलौ युगे ॥ कर्म साधारणं शक्त्या चातुवर्ण्याश्रमागतं ॥ तं प्रवक्ष्याम्यहं पूर्वं पाराशरवचो यथा ॥ षट्कर्म-सहितो विप्रः कृषिकर्म समाचरेत् ॥ क्षुधितं व्याधितं श्रांतं बलीवर्दं न योजयेत् ॥ हीनांगं व्याधितं क्लीबं वृषं विप्रो न वाहयेत् ॥ स्थिरांगं निरुजं तृप्तं सुदर्शं षंढवार्जितं ॥ वाहयेद्दिवसस्यार्द्धं पश्चात्स्नानं समाचरेत् ॥ जप्यं देवार्च्चनं होमं स्वाध्यायं चैवम-भ्यसेत् ॥ एकाद्वित्रिचतुर्विप्रान् भोजयेत्स्नातकान् द्विजः ॥ स्वयं कृष्टे तथा क्षेत्रे धान्यैश्च स्वयमार्जितैः ॥ निर्वपेत्पंच यज्ञांश्चक्रतुर्दीक्षां च धारयेत् ॥ संवत्सरेण यत्पापं मत्स्य धाती समाप्नुयात् ॥ अयोमुखेन काष्ठेन तदेकाहेन लांगली ॥ पाशको मत्स्य धाती च व्याधः शकुनिकस्तथा ॥ अदाता कर्षकश्चैव सर्वे ते समभागिनः॥ वृक्षान् छित्वा महीं भित्वा हत्वा तु कृमिकीटकान् ॥ कर्षकः खल यज्ञेन सर्व पापैः-प्रमुच्यते ॥ यो न दद्यात् द्विजातिभ्यो राशीमूल-मुपागतः॥ सचोरस्य च पापिष्ठ ब्रह्मघ्नं तं विनिर्दिशेत्॥ राज्ञे दत्वा तु षड्भागं देवानां चैकविंशतिम् ॥ त्रिंश-द्भागं ब्राह्मणानां कृषिं कुर्वन्नदोषभाक् ॥ इत्यंतेन ब्राह्मणानां कृषिकर्म निरूप्य अतःपरं क्षत्रियवैश्य-

**ययोः कृषिकर्मनिरूपणं क्रियते ।। क्षत्रियोपि कृषिं कृत्वा देवान् विप्रांश्च भोजयेत् ।। वैश्यशूद्रस्तथा कुर्यात्कृषिवाणिज्यशिल्पकं इत्यादीनाम्।। अत्र षट्-कर्मसहितो विप्रो कृषिकर्म च कारयेदित्यादिना ब्राह्मणस्य कृषिकरणमुपक्रम्य राज्ञेदत्वातु षड्भाग-मित्यंतनापसंहृतं ततः क्षत्रियादीनां कृषिकर्म-निरूपित तत्र ब्राह्मण कृषिकर्मनिरूपणप्रकरणपठित जप्यं देवार्चनमित्यादि वचन घटक द्विज शब्दस्य उप-क्रमोपसंहाराभ्यां ब्राह्मणमात्र परत्वस्यैव वक्तव्य-त्वात् ।।छ।। अन्यथा अत्रत्य द्विजशब्दस्य वर्णत्रय-परत्वं क्षत्रियोपि कृषिं कृत्वेत्यादिना पृथक् क्षत्रिय वैश्ययोः कृषिविधानस्यैव वैयर्थ्यापतः ।। तस्मात् कलिधर्मप्रतिपादकत्वेनाभिमत।।पराशरस्मृतिवचना-निकान्यापि प्रकृत विवादि वैश्यानां वेदाध्ययनयजना-दिकं न साधयाति ।। छ ।।**

**भाषांतर**---आतां द्विजशब्द तीन वर्णांला समान आहे, असा एक आक्षेप दूर करावयाचा आहे. (जप्यं देवा०) या श्लोकांत जप, होम, पूजा इत्यादिकरून द्विजांनी वेदाध्ययन करावें, असें वचन पाराशरस्मृतीच्या दुसऱ्या अध्यायाच्या ५व्या श्लोकांत आहे. या वचनावरून उत्पन्न होणारा वाद (ग्रंथकार) दूर करितात, तो असाः— ह्या श्लोकांत ब्राह्मणालाच द्विज म्हणावें असा स्पष्ट अभिप्राय आहे. कारण पाराशरस्मृतीच्या २ ऱ्या अध्यायांतील (अतःपरं०) या श्लोकां-त कलियुगांत असलेल्या चारी वर्णांचे आचार सांगणारा, (पाराशर-माधव) म्हणतो कीं, षट् कर्मांचा अधिकार असलेल्या ब्राह्मणांनीं **कृषिकर्म ( शेतीचा धंदा ) करावें. पण भुकेनें पीडित झालेल्या व**

थकलेल्या आणि रोगी अशा बैलांच्या हातून काम न घेतां, निरोगी व पुष्ट अशांच्या हातून काम घेतलें पाहिजे. ह्या प्रमाणें दोन प्रहर-पर्यंत शेतकी धंदा करून नंतर (स्नानादि क्रिया) आटोपल्यावर शक्तीप्रमाणें. एक, दोन, तीन अथवा चार स्नातकांना भोजन घालावे. असे सर्व क्रमानें सांगून ( राज्ञे दत्वा तु० ) शेतकी करणाऱ्यानें राजाला ६, देवाला २१ व ब्राह्मणाला ३० भाग देऊन उरलेल्या भागांत आपला निर्वाह करावा. नाहीं तर ( असे न केले तर ) वृक्षच्छेदाचे, भूमिभेदाचे, कृमि-कीटकहत्त्येनें पाप लागून शेतकरी दोषी होतो ! अशा रीतीनें ब्राह्मण-कर्म सांगून नंतर क्षत्रियांचीं कर्मे सांगतात कीं, क्षत्रियांनींही ( कृष्यादि कर्म ) करून ब्राह्मणां-प्रमाणेंच ( ब्राह्मणभोजन ) घालावे. असेंच वैश्य व शूद्र यांनींही करावे. ( षट्कर्म० ) या श्लोकाने ब्राह्मण—कर्मास सुरुवात करून, ( राज्ञे दत्वा० ) यानें उपसंहार केला, ब्राह्मणांचें ( शेवट कर्म ) सांगितलें. ब्राह्मणांना उद्देशून सांगितलेल्या कर्मप्रकरणातच ( जप्यं-देवार्चनं० ) हा श्लोक आला आहे. यावरून या श्लोकांत असलेला द्विजशब्द ब्राह्मणालाच उद्देशून आहे; क्षत्रिय व वैश्याना नाहीं. जर असे ( गृहीत ) धरून चाललें तर ( क्षत्रियो० ) हा विधि प्रत्येकाला ( उद्देशून ) असणे गैरशिस्त आहे. इतक्याकरितां कली-मध्यें सांगितलेली ( पाराशरस्मृतींतील ) धर्मपर वचनें सांप्रतच्या वाद करणाऱ्या वैश्याच्या वेदाधिकाराबद्दल सिद्ध होत नाहीत.

**किंच अस्यामेव पाराशरस्मृतौ ब्राह्मणक्षत्रियवैश्यानां स्वस्वकर्मधर्मनिरूपणप्रकरणे प्रथमाध्यायेषट्-कर्माभिरतो नित्यं देवतातिथिपूजकः ॥ हुतशेषं तु भुंजानो ब्राह्मणो नावसीदति ॥ अत्र षट्कर्म पदस्य अध्ययनाध्यापन यज्ञयाजनदानप्रतिग्रह षट्कर्मपरत्वं**

माधवाचार्यैरभिहितं एवं संध्यास्नानंजपोहोमोदेवतानां च पूजनं आतिथ्यं वैश्वदेवंच षट् कर्माणि दिने दिने ॥ क्षत्रियोपि प्रजारंजन् शस्त्रपाणिः प्रदंडवान् ॥ निर्जित्य परसैन्यानि क्षितिं धर्मेण पालयेत् ॥ लाभ-कर्म तथा रत्नं गवां च परिपालनं । कृषिकर्म च वाणिज्यं वैश्यवृत्तिरुदाहृता ॥ इत्यादि वचनैः वैश्यधर्म निरूपणे अध्ययनयागादयो न विहिताः ॥

**भाषांतर**—याच पाराशरस्मृतीमध्यें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या प्रत्येक वर्णापैकीं ( आचारधर्मप्रकरणांत ) पाराशरस्मृति प्रथमाध्यायांतील ( षट्कर्म ) या श्लोकांत ब्राह्मणकर्म सांगून, तसेंच क्षत्रियांनींही हातांत ( शस्त्र ) धरून परसैन्यांचा पराजय करून प्रजेचें रक्षण करीत धर्मानें पृथ्वीचें पालन करावें. आणि वैश्यांनीं, ज्यांत लाभ असेल असें कर्म रत्नांचें व गाईचें पालन व व्यापार इतक्या ( गोष्टी ) कराव्यात, असें सांगितलें आहे. या वैश्यधर्मात वेदाचें अध्ययन आणि यज्ञकर्म हीं सांगितलीं नाहीत.

कलावस्य स्वीकार्यत्वेनाभिमत पाराशरस्मृतौ वैश्यस्य अध्ययनयागयोः कुत्राप्यनुक्तत्वान्न सिध्यत्येव वैश्यानां वेदोक्तकर्माधिकारिता[१] ॥ किंतु आपस्तंब धर्मसूत्रे अशूद्राणामदुष्टकर्मणामुपायनं वेदाध्ययन-मग्न्याधेयं फलवंती च कर्माणीति मात्रेण शूद्रभिन्नानां ब्राह्मणक्षत्रियवैश्यानां उपनयनवेदाध्ययनाग्न्याधानानां विहितत्वात् एवमेव (ब्राह्मणक्षत्रियवद्शूद्रावर्णा-स्त्वाद्यास्त्रयो द्विजाः ॥ निषेकाद्याः स्मशानांतास्तेषां

---

१ ननु मास्तु पाराशरस्मृत्या प्रकृतविवादि वैश्यांना वेदाध्ययनयागाद्य-धिकारिता ॥

**वैमंत्रतः क्रिया॥) इति याज्ञवल्क्यस्मृतिवचनाच्चप्रकृत-विवादि वैश्यानां वेदयागाधिकारित्वमस्त्येवेतिचेन्न ॥**

**भाषांतर**—कलियुगांतही वैश्य आहेत, असें (पाराशरमतानें) ठरलें; पण वैश्यांना वेदाध्ययन आणि यज्ञकर्म आहे म्हणून पाराशरस्मृति कोठेंही सांगत नाही; म्हणून वैश्यांना (वेदाधिकार) या युगांत सिद्ध होत नाही. असेंच, आपस्तंब धर्मसूत्रांत (अशूद्राणां०) ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रिवर्णांना उपनयन, वेदाध्ययन, अग्न्याधान (अग्निहोत्र) इत्यादि कर्में सांगितलीं. आणि याज्ञवल्क्यस्मृतिही सांगते की, (ब्रह्मक्षत्रि०) ब्राह्मणादि तीन वर्णांनीं गर्भापासून अंत्येष्टिपर्यंत वेदमंत्रांनी (कर्मे) करावीत. ह्या प्रमाणानेंही सांप्रतच्या वाद करणाऱ्या वैश्यांना वेदोक्त कर्म आहे असें म्हणाल परंतु हें म्हणणें पुढील युक्तीला जुळत नाही.

**आपस्तंबसूत्रे अशूद्राणामदुष्टकर्मणामुपायनं वेदाध्ययनमग्न्याधेयं फलवंति च कर्माणि ॥ अस्य भाष्यं ॥ शूद्रवर्जितानां त्रयाणां वर्णानामदुष्टकर्मणां उपायनादयो धर्माः उपायनं उपनयनंनात्र त्रैवर्णिकानां उपनयनं विधीयते प्राप्तत्वात् नापि शूद्राणां प्रतिषिध्यते प्राप्त्यभवात् उपायन तावद्गृह्येगर्भाष्टमेषु ब्राह्मणमुप नयीतेत्यादिना त्रैवर्णिकानां विहितमिहापि तथैव विधास्यते ॥**

**भाषांतर**— आपस्तंब सूत्रांत असलेल्या (अशूद्राणामदु०) सूत्राचें भाष्य (व्याख्या) असें सांगतें की, उपनयन, वेदाध्ययन, अग्न्याधान या तीन कर्मांची व्यवस्था क्रमानें सांगणार आहेत. त्यांपैकीं प्रथम उपनयनाचा प्रकार सांगतात. वरील सूत्र तीन वर्णांचा उपनयनविधि सांगत नाहीं, ब्राह्मणादि तीन वर्णांना उपनयनविधि प्राप्तच

आहे. म्हणून सिद्ध गोष्ट सांगणें ( शास्त्राला ) रुचत नाहीं. शूद्रांचें उपनयन करूं नये असा निषेधही करीत नाही. शूद्राचे उपनयनविधि प्राप्त नाहींत; म्हणून गृह्यसूत्रांत गर्भापासूनहीं आठव्या वर्षीं ब्राह्मणांनें उपनयन करावें; इत्यादि वचनांवरून तीन वर्णांचें उपनयन ( विहित ) आहे. तरी येथेंही ( गृह्यसूत्रांतही ) पूर्वीप्रमाणेंच उपनयन प्रकार सांगणार आहेत.

अध्ययनमप्युक्तं तस्याचार्यकुले ब्रह्मचारिवास-इत्यारभ्य विधानात् । अनुपनीतस्य शूद्रस्याप्राप्तमेव किं च स्मशानवच्छूद्रपतितावित्यध्ययन प्रतिषेधो वक्ष्यते॥ ततश्च यस्य समीपे नाध्येयं स कथ स्वयमध्येतुमर्हति अग्न्याधेयमपि वसंते ब्राह्मणइत्यादिना त्रैवर्णिकानामेव विहितं फलवंति च कर्माणि॥ अग्निहोत्रादीनि कर्माणि त्रयाणामेव वर्णानामित्युक्तत्वात् त्रैवर्णिकानामेव ॥ विद्याग्न्यभावाच्च शूद्राणामप्रसक्तानि उक्तो विद्याग्न्यभावः ॥ तस्माद्दुष्टकर्मप्रतिषेधार्थं सूत्रं यथा स्मृत्यंतरे द्विजातिकर्मभ्यो हानिः पतनमिति॥ अप्रतिषेधे तु दुष्टकर्मणामप्याधिकारो भवत्येव ॥ फलवंति च कर्माणीत्यभिधानात् ॥ क्रियत इति कर्म इति निर्वचनात् ॥ प्रागुपनयनात्कामवादभक्ष्य इति॥ गौतमस्मरणं॥ ब्रह्महत्यादि महापातकव्यतिरिक्त विषयमित्यनुपेतस्यापि दुष्टकर्मत्व संभवाद्दुष्टकर्मणामुपनयनमित्युक्तं–एवं च प्रकृताविवादिवैश्यानामदुष्टकर्मत्वविशिष्ट वैश्यत्वं न संभवतीति–उपनयनवेदाध्ययनाग्न्याधानाद्यधिकारोपि एतेषां ना-

**स्त्येव ननु प्रकृत विवादि वैश्यानां उपनयनवेदाध्यय-नाग्न्याधानादि निरोधकः कोऽसौदोष इति चेदुच्यते ॥**

**भाषांतर**—वेदाध्ययन देखील (गुरुगृहीं) ब्रह्मचर्यव्रतानें राहून करावें, असा (विधि) शास्त्रसंमत आहे. म्हणून उपनयन नसलेल्या शूद्रास वेदाचे अध्ययन सभवतच नाहीं. इतकेंच नव्हे, तर शूद्राप्रमाणें आचरण करणाऱ्या ब्राह्मणादि वर्णांना (वेदाध्ययन) सांगूं नये, असा निषेध केला आहे. शूद्र जवळ असेल; तर त्यास ऐकूं न जावें म्हणून वेदाध्ययन करण्याचें बंद करावें. असें असून तो (शूद्र) स्वतः वेद कसा पढूं शकेल? अग्न्याधान (अग्निहोत्र ठेवणें), वसंते ब्राह्मणः इत्यादि वचनांवरून कोणी केव्हां (ऋतूंत) अग्निहोत्र ठेवावें, असा (ब्राह्मणादि) तीनच वर्णांना कालावधि सांगून, नियम केला आहे. याप्रमाणें शूद्राला वरील (विधि) मुळींच लागू होत नाहीत. ह्या सर्व युक्तींनें (अशूद्राणां०) हें आपस्तंब सूत्र दुष्ट कर्म करण्याचा प्रतिबंध करितें. कोणास विधि किंवा निषेध सागत नाही. वरील सूत्र वाईट कृत्याचा निषेध न करील, तर दुराचरण करणाऱ्या लोकांनाही वेदाध्ययनादिकांचा अधिकार पोहों-चेल. कारण (फलवं०) असें वचन आहे. म्हणजे अनधिकारी मनुष्यांची वेदोक्तक्रिया सफल होत नाहीं. म्हणून अशी कर्मपदाची व्याख्या (स्वरूप) आहे. (प्रागुपनय०) या गौतमवाक्याचा निषेध ब्रह्महत्यादि पातकांवांचून इतर पातकांबद्दल आहे. अनेक पापांनीं (दोषी) असलेल्याचा निषेध अदुष्ट या वचनानें होतो. सांप्रत वाद करणाऱ्या वैश्यांचें अदुष्ट (चांगलें) कृत्य नसल्यामुळें सदर वैश्यांना वेदादिकाचा अधिकार नाहींच. आधुनिक कालाच्या वैश्यांजवळ असा कोणता दोष आहे कीं, त्यांना वेदादिक कर्मांचा अधिकार नाहीं म्हणतां? **असें जर विचाराल तर सांगतों:—**

उपनयनं नाम वेदाध्ययनार्थकं वैदिकमंत्रैःगृह्योक्तप्रकारेण गर्भाष्टमादि यथाविहितकालेषु माणवकस्य क्रियमाण संस्कारः॥ उक्तं च आपस्तंबसूत्रे ॥ (उपनयनं विद्यार्थस्य श्रुतितः संस्कारः) इति ॥ तथाविधसंस्कारः॥ प्रकृत विवादि वैश्यानां एतत्पितृपितामहप्रपितामहादीनां पूर्वेषां एतद्वंशानां आधुनिकानां एतज्जातीयानांच केषामपि नास्तीति प्रसिद्धमेव तदा बालगोपालं ॥ तावतापि किमापतितमिति चेत्॥ सावित्रीपतितत्वाद्व्रात्यत्वं तच्च आधुनिकानां वेदोक्तसंस्कारानर्हताप्रयोजकमापतितमिति वदामः ॥

**भाषांतर**— उपनयन म्हणजे वेदाध्ययनाकरितां वेदमंत्रानें (गृह्यसूत्रांत) ८ व्या वर्षी सांगितलेल्या कालाला अनुसरून केला जाणारा मुलाचा संस्कार. आपस्तंबसूत्रही हेंच सांगते, की वेदाभ्यासाकरितां वेदमंत्रानें मुलाचें उपनयन करावें. असा संस्कार सांप्रत, कालीं विवाद करणाऱ्या वैश्यांना नाहीं; किंबहुना, या वैश्य लोकांचे पिता, पितामह आणि प्रपितामह व त्यांच्याही पूर्वजांच्या जातीत उत्पन्न झालेल्या आधुनिक वैश्यांपैकी कोणाचाही झालेला नाहीं, ही गोष्ट आबालवृद्धांस माहीत आहे. एवंच काय ठरलें ? असा पुनः प्रश्न उरलाच. त्याचें उत्तर इतकेंच, ज्यांचा वेदसंस्कार (उपनयन) लुप्त झाला असेल तो व्रात्य ठरतो. म्हणून आधुनिक वैश्यांना वेदाधिकार नाहीं, असेंच म्हणावें लागतें.

तथाहि—मनुस्मृतौ तृतीयाध्यायेकुविवाहैः क्रियालोपैः वेदाध्ययनेन च ॥ कुलान्यकुलतां यांति ब्राह्मणातिक्रमेण च ॥ एवं पाराशरमाधवीये ३४४

पुटे व्रात्यप्रायश्चित्तप्रकरणे ॥ व्रात्यो नाम सावित्री-
पतितः तस्य प्रायश्चितं मनुराह ॥ एषां द्विजानां
सावित्रीनानुच्येत यथा विधि ॥ ताश्चारयित्वात्रीन्
कृच्छ्रान् यथा विध्युपनाययेत् ॥ वसिष्ठोपि पतित-
सावित्रीकः उद्दालकव्रतंचरेत् ॥ द्वौ मासौ यावकेन
वर्तयेत् मासं पयसा अर्धमास मामिक्षया अष्टरात्रं
घृतेन षट्रात्रमयाचितं हविष्यंतु भुंजीत त्रिरात्रमभक्षो
अहोरात्रमुपवसेदश्वमेधावभृते वा गच्छेद्व्रात्यस्तो
मेन वा यजतेति ॥ तत्रमापद्विषयं उद्दालकव्रतं
त्वानापद्विषयं ॥ यस्य पित्रादयोप्यनुपनीतास्तस्याप-
स्तंबोक्तं द्रष्टव्यं ॥ यस्य पितापितामहावित्यनुपेतौ
स्यातां ते ब्रह्महासस्तुतास्तेषामभ्यागमनं भोजनं
विवाहमिति च वर्जयेत्तेषामिच्छतां प्रायश्चितं यथा
प्रथमेति क्रमेऋतुरेव संवत्सरोपनयनं तत संवत्सर
मुदकोपस्पर्शनं प्रतिपुरुषसंख्याय संवत्सरान्यावं
तोनुपेतास्युरन्पताभिः पावमानीभिर्यदंति य च दूरक
इत्येताभिर्यजुःपवित्रेण सामपवित्रेणांगिरसेनेत्यापि
वा व्याहृतिभिरेवाथाध्याप्यो अथ यस्य प्रपिता-
महादिना तु स्मर्यत उपनयनं ते स्मशानसंस्तुतास्ते-
षामभ्यागमनं भोजनं विवाहमिति च वर्जयेत्तेषामि-
च्छतां प्रायश्चित्तं द्वादश वर्षाणि त्रैविद्यं ब्रह्मचर्यं चरे-
दथोपनयनं तत उदकोपस्पर्शनं॥ अथ गृहमेधोपदेशनं
नाध्यापनंततो योनिर्वर्तते तस्य संस्कारोमथाप्रथमेति
क्रमेइत्यादि—॥

**भाषांतर**—हीच गोष्ट पुढील प्रायश्चितप्रकरणानें दृढ होणार आहे. मनुस्मृतीच्या तिसऱ्या अध्यायांतील (कुविवा०) या वाक्यानें ज्याचें वेदाध्ययन नसेल व विवाहादि क्रिया विधिपूर्वक झाली नसेल, आणि ब्राह्मणधर्माचें अतिक्रमण झालें असेल, तर कुलीनपणा नष्ट होतो असें सांगण्यांत येतें. हेंच प्रकरण पाराशरस्मृतीच्या ३४४ पानावर व्रात्य–प्रायश्चित्त सांगितलें आहे. त्यांत, व्रात्य म्हणजे ज्यास गायत्री उपदेश नाहीं असा, त्यास मनूनें प्रायश्चित्त सांगितलें, कीं व्रात्य द्विजांचें उपनयन कृच्छ्रत्रय ( तापलेलें दूध, तापलेलें तूप आणि तप्त पाणी पिणें ) प्रायश्चित्त करून करावें. असेंच, वसिष्ठस्मृतींत वसिष्ठ सांगतात कीं, व्रात्यांनी उद्दालक व्रत आचरावें. उद्दालक येणेंप्रमाणें सांगतातः— दोन महिन्यांपर्यंत यावकपान करून रहावें ( जवाच्या कण्या खाणें ). दुग्धप्राशन करून एक महिना घालवावा, १५ दिवस आमिक्षा घेऊन असावें. आठ दिवस तूप घेऊन रहावें, सहा दिवस याचना न करिता हविष्यान्न ( दूधभात ) घ्यावें, तीन दिवस जलपान करावें, एक दिवस व रात्र मिळून एक उपवास करावा आणि अश्वमेध यज्ञात जाऊन अवभृथस्नान करावें. अथवा व्रातस्तोमयाग करावा. यांतही आपद्विषय आणि अनापद्विषय असे प्रायश्चित्ताचे दोन प्रकार आहेत. याचा निर्णय पुनः सांगणार म्हणून येथें त्याचा ( आपद्–अनापद् ) विशेष विचार करीत नाही. आतां प्रायश्चित्ताधिकार सांगतात. मुलाचें उपनयन तर असो, पण ज्याच्या पित्याचें उपनयन झालेलें नाहीं, त्याविषयीं आपस्तंबसूत्रांत पहावें. तें असेंः—ज्याच्या पित्याचे आणि पितामहाचे उपनयनादि संस्कार झालेले नाहींत, त्याचे ( त्या वंशांत उत्पन्न होणाऱ्या पुत्रादिकांचे ) अतिथिसत्कार व विवाहादि क्रिया वर्ज्य

कराव्यात. त्याची इच्छा असल्यास प्रायश्चित्त करून त्याचें उपनयन करावें; आणि (यदंति०) इत्यादिक मंत्राने स्नान करवून नंतर वेदाचें अध्ययन करवावें. आणि ज्याच्या प्रपितामहाचें उपनयन झालें नसेल, तर प्रायश्चित्त करवून उपनयन व पूर्व मंत्रानें (यदंति०) स्नान केल्यानंतर विवाहादि क्रिया करवावी; पण वेदाध्ययन मात्र करवूं नये. त्याचा पुत्र असेल तर मात्र कालातिक्रमणप्रायश्चित करवून ? वर्षांपासून क्रमानें उपनयन व वेदाध्ययन करविण्यास शास्त्राज्ञा आहे.

एवं प्रायश्चित्तेंदुशेखरेपि ॥ अथ व्रात्यप्रायश्चित्तनिर्णयः ॥ व्रात्यश्चपंचदशैक विंशति वर्षरूपे ब्राह्मणक्षत्रियवैश्योपनयनकाले उपनयनाभावात तत्र वैश्योपनयनं अन्नाद्यभावे न तत्कालातिक्रमस्तस्य साधारणोक्त चांद्रायणादि चतुष्टयान्यतमं शक्त्यानुसारेण कृत्वोपनयनं कार्यं ॥ अनापदि यस्य तदतिक्रमः तस्यमानवं त्रैमासिकं तदसमर्थस्य सशिखवपनपूर्वकमेक विंशति रात्रं प्रसृति मात्र यावकपानं* मासं पयः मासार्धमामिक्षा घृतं षड्रात्रं अयाचितं त्रिरात्रं अब्भक्षता अहोरात्रं उपवास इत्युद्दालकव्रतं कार्यं ॥ यस्य पितृपितामहावनुपनीतौ तस्य संवत्सरं भैक्षाशनं गुरुशुश्रूषादिरूप ब्रह्मचर्यव्रतं तदुपनयनं ततोयावतां पुरुषाणां उपनयनं नास्तितावत्संख्याकवर्षपर्यंतं प्रायश्चित्तार्थं यदंति यच्च दूरकमित्यादि

---

* पंच विप्रभोजनं च यस्य षोडशादिवर्षादूर्ध्वमध्ययनापादि ज्ञ्यातदतिक्रमः तेन मासद्वयं यावकपानं ।

**सप्त पात मानीभिः येन देवाः पवित्रेणोति यजुः पवित्राख्येन कयानश्चित्र इति साम पवित्राख्येन हंसश्शुचिषदित्येतैर्मंत्रैः स्नानं ततो अध्याप्यता यस्य तु प्रपितामहादीनामुपनयनं नानुस्मर्यते तस्य द्वादश वार्षिकं पूर्वोक्त ब्रह्मचर्यं ततः उपनयनं. ततः पुरुषसंख्याकाब्दपर्यंतमुक्त मंत्रैः स्नानं तदनंतर-मप्यस्य गार्हस्थ्य मंत्रोपदेशः नाध्यापनं नापि व्यवहारः तज्जन्य तु स्वकालातिक्रम प्रायश्चित्त-मात्रं कृत्वा यथाकालमष्टमादिवर्ष संस्कारः अस्य अध्ययनादिकं भवति ॥**

**भाषांतर**—असाच प्रायश्चित्तेंदुशेखरांत जो व्रात्य प्रायश्चित्त-प्रकरणाचा निर्णय केला, त्यांतही बहुतकरून पूर्वप्रमाणेंच (व्रात्यास) प्रायश्चित्त सांगितलें; म्हणून जेथें विशेष आहे तेथेंच विचार करावयाचा आहे. वरील ग्रंथकार व्रात्याची व्याख्या पुढील-प्रमाणे करितात:—व्रात्य म्हणजे ब्राह्मणादि तीन वर्णांचा उपनयन-काल, अनुक्रमें १६।२२।२४ वर्षेपर्यंत शेवटची मर्यादा म्हणून सांगितला. यापुढें कोणासही उपनयनकाल मुळींच नाही. ज्याचा हाही काल आपत्तीनें (गरीबीनें) उल्लंघन झाला असेल, त्यास व्रात्य म्हणावें. त्याने (चांद्रायणादि०) चार प्रायश्चित्तांपैकीं कोणते तरी प्रायश्चित्त आपल्या शक्तीप्रमाणें करून उपनयन करून घ्यावें; आणि अनुकूलता असतांही ज्याचें कालातिक्रमण झालें असेल, त्यानें मनूनें सांगितल्याप्रमाणें एक महिना तापलेल्या दुधानें, दुसरा तप्त घृतानें व तिसरा तप्त जलानें असें तीन महिने प्रायश्चित्त (कृच्छ्र) करून उपनयन करावें. हें प्रायश्चित पूर्वापेक्षां थोडें कठीण आहे. ज्यास हें प्रायश्चित होत नसेल, त्याने शिखेसह मुंडन करून

२१ दिवस पसाभर जवाच्या घुगऱ्या खाऊन पांच ब्राह्मणांस भोजन घालावें. तसेंच, उन्मत्तपणानें उपनयनाचा काल गेला असेल, तर पूर्वीप्रमाणें उद्दालक व्रत आचरावे शेष राहिलेला विधि पूर्वीप्रमाणेच आहे, म्हणून पुन्हा येथे त्याचा विचार केला नाहीं.

**एवं हेमाद्रौ प्रायश्चित्तकांडे उपनयनकालातिक्रम प्रायश्चितमुक्तं॥कात्यायनः त्रयोदशाब्दादारभ्यषोडशाब्द व्यतिक्रमे । न संभाव्यो न पांक्तेयः सर्वकर्मबहिष्कृतः ॥ ततः परं यदिच्छेतु द्विजन्मत्वं पितात्मजे । कृत्वा स्वयं पुनःकर्म चरेच्चांद्रायणं त्रयं ॥ पुत्रस्य देहशुध्यर्थं कुर्याद्गोमुखसंभवं ॥ गोमुखजननमित्यर्थः ॥ प्राजापत्यत्रयं कृत्वा मौंजीबंधनमाचरेत् ॥ अन्यथा पतितं विद्यान्न कर्माहोभवेदिह ॥ क्षत्रियस्यद्वाविंशति वत्सरातिक्रमे वैश्यस्य चतुर्विंशति वत्सरातिक्रमे चैवमेव प्रायश्चित्तं द्विगुणं कृत्वोपयनं चरेत् ॥ अन्यथा त्रयो वर्णा दोषमाप्नुयुरिति ॥ एवं आषोडशाद्द्वाविंशाच्चतुर्विंशाच्चवत्सरात् ॥ ब्रह्मक्षत्रविशांकालः औपनायनिकः परः॥ अत ऊर्ध्वं पतंत्येते सर्वधर्मबहिष्कृताः ॥ सावित्रीपतिताव्रात्याः व्रात्यस्तोमादृतेक्रतोः॥ विनाकृते तस्मिन्नुपनयने नाधिकारिणोभवंति ॥**

**भाषांतर**—हेमाद्रीय प्रायश्चित्तकांडांत उपनयनकालाचें अतिक्रमण आलें असतां, ज्यांत प्रायश्चित्त सांगितलें त्यांत (हेमाद्रीमध्यें) १३ वर्षांपासून १६ वर्षांनंतर उपनयनाच्या कालाचें अतिक्रमण करणाऱ्या ब्राह्मणाशीं संभाषण व पंक्तिव्यवहार करूं नये, असें ( कात्यायनाचें ) मत आहे. कारण, तो सर्व कर्मानें बहिष्कृत होतो. पित्यास जर आपला मुलगा द्विज असावा अशी इच्छा असेल, तर

त्यानें स्वत: तीन चांद्रायणें करून मुलाच्या शुद्धीकरितां गोप्रसव ( हें प्रसिद्ध आहे ) करावें; आणि तीन प्राजापत्य, तीन दिवस प्रातः-कालीं भोजन, तीन दिवस सायंकाली भोजन, तीन दिवस याचना न करितां अयाचित भोजन आणि तीन दिवस अगदीं उपवास असें बारा दिवसांचें व्रत ( एक प्राजापत्य ) करून मुलाचें उपनयन करावें. असें न केल्यास तो पतित म्हणविला जातो; म्हणजे कोणत्याही कर्मास योग्य नाहीं. क्षत्रियांस २२ वर्षांनंतर कालातिक्रमण आहे व वैश्यांस तें २४ वर्षांनंतर आहे. या दोघांनी हेंच प्रायश्चित्त द्विगुणित करून उपनयन करावें. प्रायश्चित्तरहित तिन्ही वर्ण दोषी ठरतात. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या उपनयनाच्या कालाची मर्यादा क्रमानें, १६, २२ व २४ मानिली आहे. त्यानंतर ते पतित होऊन व्रातःस्तोम यज्ञादिक प्रायश्चित्तावांचून उपनयनास अधिकारी होत नाहीत.

एवं गर्भाष्टमेऽब्दे कुर्वीत ब्राह्मणस्योपनयनं ॥ गर्भा-देकादशे राज्ञो गर्भात्तु द्वादशे विशः ॥ आषोडशा-द्ब्राह्मणस्य सावित्रीनातिवर्तते ॥ आद्वाविंशात्क्षत्रबंधो-राचतुर्विंशतेर्विशः ॥ अत ऊर्ध्वं पतंत्येते यथाकाल-मसंस्कृताः ॥ सावित्री पतिता व्रात्याः भवंत्यार्य विगर्हिताः॥ यो नाधीत्यद्विजो वेदानन्यत्र कुरुते श्रमं ॥ सजीवन्नेव शूद्रत्वमाशुगच्छतिसान्वयः ॥

**भाषांतर**—तसेंच, गर्भापासून ८ व्या वर्षी ब्राह्मणाचें उपनयन करावें. गर्भापासून ११ व्या वर्षी राजाचें आणि गर्भापासून १२ व्या वर्षी वैश्याचें करावें. कालातिक्रमण झालें तर पूर्वीप्रमाणें व्रात्य समजावे. जो वेदाचें अध्ययन न करितां इतर धर्म करितो, तो आपल्या कुलासह जिवंत असूनही शूद्रच राहतो.

इत्यादि वचनसमूहेन यस्य यस्य वर्णस्य योयं उपनयनस्य परमावधिः कालः ब्राह्मणस्य षोडश-वर्षात्मकः क्षत्रियस्य द्वाविंशति वर्षात्मकः वैश्यस्य चतुर्विंशति वर्षात्मकः तस्मिन्नेव तत्तद्वर्ण बटो-रुपनयनं कार्यं । अन्यथा सावित्री पतितत्व प्राप्त्या उपनयनायोग्यत्व प्राप्तौ पूर्वोक्त वचनैरुदीरितं आ-पस्तंब सूत्रादिषु विविक्षितं उद्दालकव्रतादि रूपं प्रायश्चित्तं यथानिमित्तं कृत्वा उपनयनं कार्यं ॥ तदपि प्रायश्चित्तं क्षत्रियवैश्ययोर्द्विगुणितं कार्यमिति हेमा-द्र्यादिषु स्पष्टं प्रतिभाति । अथ यस्य पिता विधिना नोपनीतः पितामहप्रपितामहावपिनोपनीतौ तद्विष-येपि अयं ब्राह्मणजातीय इति जनानां स्पष्टज्ञाने द्वादश वार्षिक ब्रह्मचर्यादि घटितोद्दालक व्रतादि रूप प्रायश्चित्तानंतरं उपनयनादिकं कृत्वा प्रतिपुरुष संख्यायेत्यादि प्रकारेण अतीत पुरुषसंख्याक वर्ष-पर्यंतं यदंति यच्च दूरक इत्येताभिः मार्जनादि रूप प्रायश्चित्तस्य विधानोत्तरं ब्रह्ममेधमंत्रमात्रोपदेशनं नतु तदतिरिक्त वेदमंत्राध्ययनं तथापि सव्यवहाराभावः अध्यापनाभावश्चेति एवं व्यवस्थितं भवति ॥

**भाषांतर** — पूर्वींच्या सर्व वचनांवरून ज्या ज्या वर्णाची उप-नयनकालाची मर्यादा सांगितली, त्या काली त्या त्या वर्णानें बटूचें, उपनयन करावें. असे न होईल तर तो वर्ण पतित होऊन आपस्तंब-सूत्रोक्त उद्दालक व्रतादि प्रायश्चित्त करून उपनयन करूं शकतो. तेंच प्रायश्चित्त क्षत्रिय--वैश्यांस द्विगुणित सांगून, उपनयन ( हेमाद्र्यादि ग्रंथांत ) स्पष्ट सांगितलें आहे. ज्याच्या पित्याचें

उपनयन विधिपूर्वक नसेल आणि पितामहाचें व प्रपितामहाचेंही तें झालें नसेल, तर आपल्या ( पुत्राच्या ) ब्राह्मणजातीचा संशय दूर करण्यास १२ वर्षांपर्यंत असलेलें ब्रह्मचर्यादि व्रत ज्यांत आहे, असें उद्दालक व्रतादि प्रायश्चित्त केल्यानंतर पुत्राचें उपनयन करावें; आणि उपनयन न झालेल्या पूर्वजापासून (बाप, आजोबा व पणजोबा) जितकीं वर्षें झाली असतील. तितकी वर्षेंपर्यंत यदंति० इत्यादिक मंत्रानें मार्जन ( स्नान ) करवावें. ( हा सर्व विधि पिता नसल्यास ब्राह्मणद्वारा करवावा.) त्यानंतर तो ( पुत्र ) विवाहादिकास योग्य होतो; पण वेदाचें अध्ययन किंवा अध्यापन ( पढविणें ) करण्यास योग्य होत नाही. म्हणून ग्रंथकारानें आतांपर्यंत चालत आलेल्या प्रकरणाचा उपसंहार केला.

क्षत्रियवैश्ययोः पूर्वोक्तरीत्या असंस्कृत कुलजयोः प्रायश्चित्तमपि नास्ति परिग्रहोपि नास्तीत्येव वक्तव्यं। अस्तुवा यथा कथंचित हेमाद्र्याद्युक्तरीत्या ब्राह्मणोक्त प्रायश्चित्त द्विगुण प्रायश्चित्तानुष्ठानेन उपनयनादिकमित्यंगीकारेपि प्रकृत विवादि वैश्यानां कुले वेदोक्तरीत्या उपनयनाध्ययनादिकं एतत्पुरुषमारभ्य इयत्पुरुषाणामेव प्रनष्टं ततः पूर्वमासीदित्यत्र न किंचिन्मानमस्ति ॥ कथं चित् ज्ञातुमपि न शक्यत इति सर्वथा प्रायश्चित्त विधानस्यैवा संभवात् ॥ न च द्वापरादौ वेदोक्तरीत्या उपनीताः वैश्या असन् तद्वंशीया एव इमे इति निश्चित्य प्रायश्चित्ताविधीयतामिति वाच्यं ॥ द्वापारांतमारभ्य एतत्कालपर्यंतं पंचसहस्राधिकवर्षाणामतिक्रांतत्वेन शतपुरुषपर्यंतस्य संभवेन शताधिक संवत्सर साध्य

प्रायश्चित्तस्य विधातुमशक्यत्वात् ॥ किं च एतद्वंशीयानां यस्मिन्काले येन दोषेण वेदाधिकारः प्रच्युत इत्यास्यापि ज्ञातुमशक्यत्वात् ॥ तद्दोषपरिहारजनक प्रायश्चित्तस्य विधातुमशक्यत्वात्॥ न च प्रायश्चित्तानां प्रतिनिधीनां मुक्तत्वात् एतेषामपि किंचित्प्रायश्चित्तं प्रतिनिधिं परिकल्प्य तदनुष्ठानोत्तर उपनयनादिकं क्रियतामिति वाच्यं॥ प्रायश्चित्तप्रतिनिधिनायावती शुद्धिःसंभावनीया तावच्छुद्धिसाध्यस्य पौराणिक मंत्रादिना षोडश कर्मानुष्ठानस्य कन्यका पुराणादि प्रोक्तस्य काचापिप्पलीन्यायेन सिद्धत्वात् ॥ अन्येषां पापानां प्रायश्चित्त प्रतिनिधिं परिकल्प्यसंग्रहः क्रियते तद्वदेतेषां कुतो न क्रियत इतिचेच्छृणु ॥

**भाषांतर**—संस्कारहीन क्षत्रिय व वैश्य यांना प्रायश्चित्तादि विवाहसंस्कार होणें शक्यच नाही. हेमाद्र्यादि ग्रंथांत ब्राह्मणास सांगितलेलें प्रायश्चित्त द्विगुणित करण्याचें कबूल केलें, तरी हल्ली वाद करणाऱ्या वैश्यकुलांत वेदोक्त कर्म अमक्या पुरुषापासून राहिलें व त्यापूर्वी झालें होतें याविषयी कांहीं प्रमाण नाही व अन्य उपायानेंही कळणें असाध्य आहे; म्हणून प्रायश्चित्त मुळीच संभवत नाही. द्वापारयुगांत, वेदोक्तपद्धतीनें उपनयन झालेले जे वैश्य आहेत, त्यांच्या वंशांत उत्पन्न आलेले हल्लीचे वैश्य आहेत असें मानिलें, तरी द्वापाराचाही काल होऊन आज ५ हजार वर्षें झालीं. आतांपर्यंत त्यांचे शंभर पुरुष तरी होऊन गेले. अशी परिस्थिति असतां शंभराव्या पुरुषाचें प्रायश्चित्त शास्त्रांत कोठेंच नाही. तीन पुरुषांस ऊर्ध्व प्रायश्चित्त शास्त्रसंमत नाहीं. तसेंच ह्या वंशाचे वेदाधिकार अमक्या कालापासून ह्या दोषानें गेला हें कळणेंही

जर शक्य नाहीं, तर त्या दोषाचा परिहार होणारें प्रायश्चित्त तरी कसें होईल? प्रायश्चित्ताचे प्रतिनिधि द्रव्यादिक शास्त्रानें जे सांगितले आहेत, त्यांपैकीं वैश्यांपासून प्रायश्चित्ताबद्दल कांहीं तरी द्रव्य घेऊन त्यांचें उपनयनादिक विधि करावे ही कल्पना चुकीची आहे. कारण प्रायश्चित्तप्रतिनिधीनें जी शुद्धि संभवते, ती पौराणिक मंत्रानें कन्यकापुराणांतील काचा—पिप्पलीन्यायाप्रमाणें प्रायश्चित्त केलें तर शुद्धि होते. कांहीं पातकांबद्दल प्रायश्चित्तप्रतिनिधीनें निर्वाह होत आहे. तर हल्लींच्या वैश्यांचेंही प्रायश्चित्तप्रतिनिधीनेंच कां करीत नाहीं? या प्रश्नाचें उत्तर ऐकः—

पापस्य द्वे शक्ती भवतः परलोकदुःखापादिका इहलोके सव्यवहार्यत्वादि प्रतिबंधिका चेति ॥ तत्र केषांचित्पापानां परलोकदुःखापादकशक्ति मात्रं तेषां प्रायश्चित्त प्रतिनिध्यनुष्ठानेपि न दोषः येषां पुनरिहलोक सव्यवहार्य प्रतिबंधिका शक्तिरस्ति तेषां प्रायश्चित्त प्रतिनिध्यनुष्ठानेन न संपूर्ण व्यवहार्यतासिद्धिः किं च केषांचित्पापानां यथोक्त प्रायश्चित्तानुष्ठानेप्यसव्यवहार्यतायाः नाम्यास्मिन् लोके प्रत्यापत्तिर्विद्यते कल्मषं तु निर्हण्यत इत्यादिना द्विजस्याब्धौ तु नौयातुः शोधितस्यापि संग्रहः ॥ इत्यादिना च आपस्तंबादिभिर्वोक्तत्वात् ॥ प्रकृते सावित्री परिभ्रष्टानां प्रायश्चित्तकरणेप्य सव्यवहार्यतायाः प्रायश्चित्तेंदुशेखरादौ प्रतिपादितत्वात् ॥ किं च प्राजापत्य चांद्रायणादीनां प्रतिनिधिना मुक्तत्वेपि द्वादश वर्षाणि त्रैविद्यकं ब्रह्मचर्यं चरेत् प्रतिपूरुष संख्याय संवत्सरान्यावंतोनुपेतास्युस्तमाभिः पाव-

मानीभिरित्यादिना उक्त प्रायश्चित्तस्य क्वापि प्रतिनिधेरनुक्तत्वात् प्रतिनिधिविधानस्य सर्वथाप्यनौचित्यात् ॥

**भाषांतर**—पापाची शक्ति ( सामर्थ्य ) दोन प्रकारची आहे. स्वर्गादिसौख्य प्रतिबंध करून परलोकांत दुःख भोगणे आणि या लोकांत इतर लोकांशी भोजनादि व्यवहार न होणें. या दोन्ही शक्तींतून ज्या पापाचें सामर्थ्य परलोकदुःख देण्याचें आहे, त्या पापाचें प्रायश्चित्त प्रतिनिधीनें केल्यास कांही दोष नाही. जें सामर्थ्य इहलोकी सर्व व्यवहार बंद करूं शकतें, त्या पापाचें प्रायश्चित्त प्रतिनिधीनें होऊन सर्व व्यवहार होणें शक्य नाही. कित्येक पापांचें प्रायश्चित्त सर्व व्यवहारांस उपयोगी पडतें म्हणून जें मत आहे, तें नौकायानादि (नावेनें प्रवास करणे) प्रायश्चित्ताविषयीं मानलें आहे, असें आपस्तंबादि सूत्रानें स्पष्ट सांगितलें. सांप्रत प्रचलित असलेल्या वेदोक्त-कर्म-बहिष्कृताचे, प्रायश्चित्त केल्यावाचून सर्व व्यवहार होत नाहींत. असें प्रायश्चित्तेंदुशेखरांत प्रतिपादन केलें आहे प्राजापत्यादि करून चांद्रायणादिकांच्या प्रायश्चित्ताबद्दल प्रतिनिधि उक्त असला, तरी १२ वर्षेपर्यंत ब्रह्मचर्यादि व्रताचरण, प्रतिपुरुषाच्या संवत्सरमानानें पूर्वकथित मंत्रांच्या स्नानाचा प्रतिनिधि कोठेंही सांगितला नाही; म्हणून चालू असलेल्या बाधाचा निकाल प्रतिनिधीनें होणें अयोग्य आहे.

किंच एतद्विवादि वैश्यानां एतत्सजातीयानांच प्रकृते बहुकालमारभ्य पैङ्गिकलुगोत्रमित्यादि द्व्युत्तरशत गोत्राणि प्राकृत संकेत विशिष्टानि संति ॥ अत एवैतेषां वैश्यानां [ सुद्दियंवडलनगरेवश्या ] इति

बहुकालमारभ्य इदानीमपि व्यवहारो वर्तते नैतानि गोत्राण्यापस्तंबादि प्रवरसूत्रादिषु पठितानि ॥ यद्येतेषां वैदिकं कर्मविहितं स्यात् तदा आपस्तंबादि प्रवर सूत्रोक्त गोत्राण्यवस्युः ॥ तथा क्वापि न दृश्यते किं च एतेषां इयं शाखेत्यपि नियमोनास्ति या शाखया यद्गोत्रमवलंब्य कर्मकारयितुं शक्यं स्यात् ॥

भाषांतर—ह्या वेळेस असणाऱ्या विवादि वैश्यांची आणि या जातींतील उत्पन्न झालेल्याची पुष्कळ दिवसांपासून आलेली पेड्डिकलुगोत्रादि १०२ प्राकृत—गोत्रांतीलच आहेत. ( मुख्य ब्बंड्लनगरवैश्य ) म्हणून बऱ्याच दिवसापासून होत असलेला व्यवहार अद्यापि आहे. वर आलेली गोत्रें आपस्तंब प्रवरसूत्रांत पठित नाहीत. ह्यांचें वेदोक्त कर्म प्रचलित असतें, तर आपस्तंबसूत्रांतील आलेलीं गोत्रेंच असलीं पाहिजेत, असें उदाहरण कोठेंच दिसत नाही. आणि ह्यांचीही शाखा म्हणून असाही नियम नाही. तसें असतें तर त्या शाखेला जें गोत्र आहे, तें गोत्र घेऊनच वेदोक्त कर्म केलें असतें.

तथा हि ॥ आपस्तंब श्रौत्रसूत्रे दर्शपूर्ण मास प्रश्ने ॥ सूत्र ॥ ऊर्ध्वज्ञुमासी संहोतारं वृणीते अग्निर्देवो होता देवान्यक्षद्विद्वानश्चिकित्वान्मनुष्यवद्भरत वदमुवदिति यथा वर्षयो यजमानः ॥ भाष्यं ॥ देव होतृरूपेण च मनुष्य होतुर्देवज्या प्रार्थनं वरणं ॥ अग्निर्देवो होतेत्यादि मंत्रलिंगात् ॥ ब्राह्मणे च य एव देवानां होतारं वृणीत इति स्तवनात् ॥ पशुसोमयोर्देवंच मानुषं च होतारौवृवोति वचनाच्च यथा-

र्षेयः यस्य यजमानस्य प्रवरः प्रवरकांडेदर्शितः तस्य तत्रोक्तानृषीनमुवदमुवदिति कीर्तयन् होतारं वृणीते यावंतस्युरिति यथा जमदग्नि वदौर्ववद्भृगुवदि- त्यादि ॥ एवमारभ्य ॥सूत्रं॥ ब्रह्मण्वदा चवक्षवद्ब्रा- ह्मणा अस्य यज्ञस्य प्रावितार इति प्रवर शेषमाह इत्यं- तेन सूत्रेण ॥ एवं आपस्तंबप्रवरसूत्रे त्रीन् वृणीते मंत्रकृतो वृणीते यथर्षिमंत्रकृतो वृणीत इति ज्ञायते अथैकेषामेकं वृणीते द्वौ वृणीते त्रीन्वृणीते न चतुरो वृणीते न पंचाति प्रवृणीत इति विज्ञायते अत ऊर्ध्वोध्वर्युर्वृणीत अमुतोऽर्वाचोहोतेति विज्ञायते भृगूणामेवाग्रे व्याख्यास्या भो जामदग्न्यावत्सा- स्तेषां पंचाऋषेय प्रवरो भार्गवच्यावनाप्नवानौर्वजाम- दग्न्येति । जमदग्निवदूर्ववदप्नवानवच्चवनवद्भृगु- वदिति । इत्यादि सूत्रैः दर्शपूर्ण मासाधानाग्निष्टो- मादिषु अध्वर्युहोतृभ्यां यजमानस्य प्रवरसूत्रोक्तप्रवरः वक्तव्य इति सिध्ये विवादि वैश्यानां प्रकृते विद्यमान अधिक शतगोत्राणां सूत्रानुक्तत्वात् तेषां सूत्रोक्त प्रवराभावाच्च लुप्यंत एव इतोपि सर्वाः क्रियाः अत एव प्रवरमंजर्यां बोधायनोक्त प्रवरव्याख्यानावसरे अतोहेतोः प्रवरान् व्याख्यास्यामः तदभावे कर्मा- धिकारानुपपत्तिः इत्युक्तत्वात् ॥

भाषांतर —'ऊर्ध्वंनु मार्गी०' यापासून 'भृगुवदिति' ह्या शेवट- च्या सूत्रवचनावरून दर्शेष्टि, पौर्णिमासेष्टि, आधान व अग्निष्टो- मादिक यागप्रकरणांत अध्वर्यु व होता या ऋत्विजांनीं यजमानाचा, प्रवरसूत्रांत उक्त असलेल्या प्रवराचा उच्चार करावा असा विधि

आहे. असें स्पष्ट असून या वैश्यांची प्रकृत असलेली १०२ गोत्रें सूत्रविहित नाहींत, म्हणून प्रवर आणि गोत्र याच्या अभावामुळें ह्यांची ( वैश्यांची ) वेदोक्त क्रिया यापुढेंही लुप्तच आहे. प्रवरमंजरीनामक ग्रंथांत बौधायनानें प्रवरव्याख्यान करते वेळी (अतोहेतोः) प्रवर व गोत्र ज्यास नाही त्यांस वेदोक्त-कर्माचा अधिकार नाही; असे स्पष्ट म्हटलें आहे. म्हणूनच प्रवर सांगणार आहों.

**न च पुरोहित प्रवरेण वरणंस्यादिति वाच्यं ॥ एतेषां क्वापि नियताः कुलपुरोहिता नसंत्येवयस्य यस्मिन् ग्रामे यदा स्थितिः तद्ग्रामीण पुरोहितेन तदा तेषां क्रियाः कारयिष्यंते तस्यै वान्य ग्रामवासकाले तद्ग्रामीण पुरोहितः क्रियाः कारयिष्यंत इत्यतः एतेषां पुरोहित प्रवरोप्यनुगतः एक एवेत्यपि वक्तुं न शक्यते ॥**

**भाषांतर**—पुरोहितप्रवरानें यजमानप्रवराचा उच्चार करावा हेंही सयुक्तिक नाही. कारण ह्यांचे पुरोहित नियमानें हेच असतात असें निश्चित सांगतां येत नाही. बरें, ज्या गांवांत हे वैश्य आहेत, त्या गांवाच्या पुरोहितानें त्यांच्या क्रिया मान्य कराव्या असें मान्य केलें, तर तेच वैश्य अन्य ग्रामांत निवास करतील तर तेथील पुरोहिताकरवीं आपलें कार्य करवितील. यामुळेंच पुरोहितप्रवरही परंपरेनें अमुकच असेल असें म्हणणें शक्य नाहीं.

**यत्तु प्रवरमंजर्यां बौधायनोक्तं वैश्यानां त्र्यार्षेयः प्रवरो भवति भालंदनवात्सप्रमदमांगिलेति होता॥ मदमांगिलवद्वत्सवद्भलंदनवदित्याद्यध्वर्युरित्युक्तत्वात् ॥ किं च यजुर्वेदे पंचम कांडे द्वितीय**

प्रपाठके वात्सप्रेणोपतिष्ठते इति वर्तते॥ अस्य भाष्यं॥ तदेतदेकादश मंत्रात्मकं सूक्तं विनियुंक्ते॥ वात्सप्रेणोपतिष्ठते एतेन वैवत्सप्रीभालंदनोऽग्नेः प्रियंधामा वारुंधाग्नेरेवैतेन प्रियं धामा वरुंधे इति यजुर्वेदे ५।२।१ वत्साप्रिनामकेन महर्षिणा अधीतं दिवस्परीत्यादिकं सूक्तं वात्स प्रतेनाग्निमुपतिष्ठेत ॥ भालंदनस्य पुत्रो वत्सप्रीणामको महर्षिः एतेन सूक्तेन अग्नेःप्रियंधामस्थानं प्राप्तवान् ततो यजमानोपि तथा प्राप्नोति इत्युक्तत्वात् वैश्यानामपि भालंदनवात्सप्रमद मांगलिति प्रवरो वर्तते किं च दिवस्परीत्यनुवाकस्य वात्सप्रेति संज्ञा यास्मत्वात ॥ तादृशानुवाकस्य वत्सप्रीरेव ऋषिः स च वैश्यजातीयः वैश्य प्रवरे वत्सप्रेः प्रोक्तत्वादिति कस्यचिदभिमानपूर्वकं प्रलपितं तत्तुन समीचीनं इदानीं विद्यमान विवादिनां वैश्यमन्यानां कस्यचिदपि वात्साप्रिगोत्रमिति नास्त्येव किं च एतेषांमाधुना विद्यमानव्द्याधिक शत गोत्रेषु वात्साप्रि गोत्रमित्यपि नास्तीत्यत्र तादृश गोत्रस्य युगांतरस्थ सद्वैश्य परत्वस्यैव वक्तव्यत्वात् किं च दिवस्परीत्यनुवाकस्य ऋषित्वेनाभिमतो वात्सप्रीरपि न वैश्यः वैश्यस्य अध्यापनाद्यभावान्मंत्रऋषित्वासंभवात् ॥

भाषांतर—प्रवरमंजरी ग्रंथामध्यें बोधायनानें वैश्यास त्र्यार्षेय प्रवर आहे असें म्हणून निर्देश केला. ते प्रवर असे:— सूत्रोक्त मंत्र मदमांगी म्हणून अध्वर्यूनें प्रेष दिल्यावर होत्यानें भालंदनवात्समदमांगील असा प्रवरोच्चार करावा. तसेंच, यजुर्वेदांत पंचमकांडाच्या द्वितीय प्र-

पाठकामध्यें 'वात्सप्रेणोपतिष्ठते' असें एक वचन आहे. याचा अर्थ भाष्यकारांनीं वत्सप्रिनामक महर्षीनें, अग्नीची उपासना करते वेळीं दिवस्पीर नांवाच्या अनुवाकाचें पठण करून, अग्नीचें प्रियंधाम नांवाचें स्थान प्राप्त करून घेतलें. तेव्हांपासून या प्रवरोच्चारानें यजमानही त्या स्थानास जातो असें सांगितलें. म्हणून वैश्यांनाही हे भालदन-वात्सप्रमदमांगील प्रवर आहेत आणि दिवस्परि अनुवाकास वात्स-प्र अनुवाक् म्हणून संज्ञा आहे. याकरितां वैश्यप्रवरांत ( वत्सप्रेः प्रोक्त-त्वात्०) या वचनावरून वत्सप्रि वैश्यजातीचा आहे, या अभिमानानें वैश्यांचे प्रवर वात्सप्रि हे निश्चित आहेत असें म्हणणें योग्य नाहीत. कारण प्रकृत विवादि वैश्यांपैकी कोणाचेही वात्सप्रि प्रवर नाहीत, आणि सध्यां असलेल्या १०२ गोत्रांतही वात्सप्रि म्हणून प्रवर नाहीत. म्हणूनच वात्सप्रि गोत्राचे वैश्य पूर्वयुगांतच होते. या युगांत नाहीत असेंच मानावे लागतें. दिवस्परि अनुवाकाचा अभिमानी ऋषि ( वात्सप्रि ) वैश्य जातीचा म्हणून काहीं लोकांचा मत आहे. पण तो चुकीचा समजला पाहिजे. कारण, वैश्यास अध्यापनाचा अधिकार नाही. म्हणून वैश्य ( मंत्रऋषि ) म्हणविला जात नाही. वात्सप्रि हा मंत्रऋषि असून वैश्य कसा होईल ?

**न च वैश्य प्रवर घटकत्वाद्वैश्यत्वं वक्तुं युक्तं क्षत्रियाणामपि काश्यप आत्रेयादि ऋषिघटित प्रवर गोत्रयोसत्वात् तद्गोत्रप्रवर्तक कश्यपात्र्यादिऋषि-णामपि क्षत्रियत्वापत्तेस्संभवात् ॥ न च तर्हिवत्सप्रेः ब्राह्मणत्वे कथं वैश्यप्रवरघटकत्वमिति वाच्यं ॥ ब्राह्मणस्य चतुर्ष्वपि वर्णेषु विवाहस्य पूर्वं सिद्धत्वात् चातुर्वर्णोत्पादकत्वमपि ब्राह्मणानां संभवतीति वत्स-प्रेर्वैश्योत्पादकत्वेपि वैश्यप्रवरघटकत्वोपपत्तेः वत्सप्रि**

नामको ऋषिर्नवैश्य इति तत्त्वं ॥ तस्मादेतेषां विवादि वैश्यानां प्रवरसूत्रोक्त गोत्राणि केषामपि नास्तीति सिद्धं ॥ एतदेव एतेषां वेदमंत्रैर्वेदोक्त-कर्माधिकारो नास्तीत्यत्र प्रमाणं द्रष्टव्यं ॥ एवमेव अस्य इयं शाखेति नियामका भावाच्च एतेषां विवादिनां वेदोक्तमंत्रैः क्रियाकलापस्य सर्वथा न सिद्धिरेव ॥

**भाषांतर**—वात्सप्रिऋषि वैश्य प्रवरांत अंतर्भूत होतो. म्हणून तो वैश्यजातीय आहे असें विधान केल्यास काय बोध होतो ? ह्यास हेंच प्रत्युत्तर आहे की. क्षत्रियाची गोत्रेंही काश्यप आणि आत्रेय आहेत, म्हणून अत्रि व कश्यप क्षत्रिय जातींतले होत असें म्हणावें लागेल. असें जर आहे, तर वत्सप्री ब्राह्मण असून वैश्यप्रवरांत कां येतो ? असा प्रश्न सहज संभवतो; पण पूर्वी ब्राह्मणांना चारी वर्णांच्या कन्या विवाहरूपानें वरतां येत होत्या; म्हणून ब्राह्मणांस चातुर्वर्ण्य उत्पन्न करण्याचा अधिकार होता. यावरून वत्सप्रिऋषि वैश्योत्पादक होता म्हणूनच वैश्यप्रवरांत सांपडतो. परंतु तो वैश्य नव्हे असें स्पष्ट आहे. या कारणामुळें विवादि वैश्याचे प्रवरसूत्रांत असलेल्या गोत्रातून एकही गोत्र जुळत नाही. हेंच प्रमाण या वैश्यांना वेदोक्त कर्माचा अधिकार नाही. असें प्रत्यक्ष सिद्ध होतें.

न च एतेषां विवादि वैश्यानां सूत्रप्रोक्तानि गोत्राणि शाखाश्च कल्पयित्वातद्रीत्या सर्वाः क्रियाः क्रियतामिति वाच्यं ॥ यस्य यद्गोत्रं या च शाखा कल्पनीयेत्यत्र नियामकाभावात् ॥ स्वेच्छानुसारेण कल्पने युगांतरे स्वस्य विद्यमान शाखा भिन्नशाखा

भिन्नशाखास्वीकारादिना महान् प्रत्यवायः ॥ तथा हि ॥ पराशरमाधवीये २७ पुटे वासिष्ठस्मृतौ ॥ पारंपर्यागतो येषां वेदस्सपरिबृंहणः ॥ तच्छाखाकर्म कुर्वीत तच्छाखाध्ययनं तथेति ॥ स्वशाखापरित्यागं निषेधति ॥ यः स्वशाखां परित्यज्य पारक्यामधिगच्छति ॥ स शूद्रवद्बहिष्कार्यः सर्वकर्मसु साधुभिः ॥ स्वीयशाखोज्झिता येन ब्रह्म तेनोज्झितं परं ॥ ब्रह्महेव स विज्ञेयस्सद्भिर्नित्यं विगर्हित इति ॥ एवं रीत्या प्रत्यवायस्य विद्यमानत्वान्नूतनशाखावलंबनेन प्रत्यवायप्राप्तेर्वरं इदानीं विद्यमानवंशपरंपरागतपौराणिकमार्गेण कर्मानुष्ठानं (प्रक्षालनाद्धि पंकस्य दूरादस्पर्शनं वरमिति न्यायात्॥) यथा कथंचित्प्रायश्चित्ते कृतेऽपि गोत्रशाखाज्ञानाभावाद्वेदमंत्रैः कर्माधिकारित्वं न सिध्यत्येव ॥

**भाषांतर**—विवादि वैश्यांच्या गोत्रप्रवराचा परंपरागत शोध होत नसला, तरी प्रवरसूत्रांत असलेल्या गोत्रशाखेचीच कल्पना करून, त्या शाखेनें वैश्यांच्या सर्व क्रिया केल्यास काय प्रत्यवाय आहे असेंही म्हणतां येत नाहीं. कोणास कोणतें गोत्र व शाखा नियमित करावी यास कांहीं प्रमाण नाहीं. स्वेच्छाचारानें कल्पना करून अन्ययुगांत प्रचलित असलेल्या शाखेचें उच्छेदन केल्यास मोठा दोष सांगितला आहे. पाराशरस्मृतीच्या २७ व्या पानांत वसिष्ठस्मृति म्हणते कीं, परंपरेनें आलेल्या वेद व शाखेचा परित्याग करून परशाखेचें अवलंबन करितो त्यास सदाचारसंपन्न मनुष्यानें बहिष्कृत करावें आणि स्वशाखात्याग करणारा ब्रह्मघातकी म्हणून निंद्य मानिला जातो. या सर्व प्रमाणानें नूतनशाखेचा स्वीकार करून दोषी

झाल्यापेक्षां सांप्रत प्रचलित वंशजपरंपरागत पौराणिक मार्गानेंच कर्म केल्यास, पंकांत ( चिखलांत ) पाय टाकून धुतल्यापेक्षां पाय न घालणेंच योग्य आहे. तात्पर्य प्रयत्नानें प्रायश्चित्त केलें तरी गोत्र-शाखेच्या अभावामुळें वैश्यांस वेदमंत्रांनीं कर्माचा अधिकार नाही, हेंच सिद्ध आहे.

**एवं गोत्राज्ञाने संस्कारमयूखोक्तरीत्या काश्यप-गोत्रं कल्प्यतां तथा हि संस्कारमयूखे गोत्रप्रवर-निर्णयप्रकरणे यस्य विस्मरणादिना गोत्रनाशस्तस्य काश्यपगोत्रं (गोत्रनाशे तु काश्यपं) इति व्याघ्रोक्ते-रिति ॥ तथा च गोत्रापरिज्ञानात्काश्यपगोत्रमनु-सर्तुं शक्यमिति न वाच्यं ॥ यस्य ब्राह्मणत्वादिजाति-स्सर्वजनप्रसिद्धा ॥ गोत्रं च विस्मरणादिना न ज्ञायते तन्मात्रविषयमेवैतच्छास्त्रं ॥ एतेषां विवादि वैश्यानां गोत्रविस्मरणात्काश्यपमेव कल्पने सर्वेषामपि काश्यपगोत्रत्वेन परस्परविवाह एव न स्यात् ॥**

**भाषांतर**—गोत्रांचें परिज्ञान होत नसल्यास काश्यप गोत्राची कल्पना करावी असें संस्कारमयूखांतील गोत्रप्रवरनिर्णयांत स्पष्ट सांगितलें. कारण विस्मृतीनें ज्याचें गोत्र नष्ट झालें त्यास काश्यप गोत्र असावें. 'गोत्रनाशे तु काश्यपं' म्हणून व्याघ्रऋषीचें मत आहे; याकरितां काश्यप गोत्र अनुसरण्यास शक्य आहे. तर गोत्राची अडचण मुळीच उरली नाही हें म्हणणें योग्य नाहीं कारण; ज्याची ब्राह्मणादि जाति सर्व जगप्रसिद्ध आहे त्याची गोत्रें विस्मृति झाल्यास काश्यपगोत्र असावें; हें शास्त्र तात्पुरतें ब्राह्मणमात्रापुरतें आहे. विवादि वैश्यांचे गोत्राभावामुळें काश्यपगोत्र मानल्यास सर्वांचें

एकच गोत्र होऊन परस्परांच्या विवाहास प्रतिबंध होणार आहे. विवाह होत नाहीं.

एवमेव पुरोहितगोत्रकल्पनेऽपि एक ग्रामवासिनां सर्वेषामेक एव पुरोहित इति तेषां सर्वेषां एकगोत्रत्वापत्त्या परस्परं विवाह एव न स्यात् ॥ किं च सर्वैः पुरोहितगोत्राश्रयणेऽपि पुरोहितकानां वैश्यानां परस्परमविवाहः स्यात् ॥ तथा हि संस्कारमयूखे गोत्रप्रवरनिर्णयप्रकरणे स्मृत्यर्थसारे गुरोस्सगोत्रप्रवरा नोद्वाह्या क्षत्राविट्गणैरित्युक्तत्वात् ॥ पुरोहितसमानगोत्राकन्या उद्वाहनिषेधात् ॥ यथेच्छं गोत्रकल्पनेऽपि एतेषां पूर्वं यद्गोत्रं स्थितं तद्गोत्राज्ञानेन तद्गोत्रसमान गोत्रकन्यादिविवाहसंभवे महान् प्रत्यवायस्स्यात् ॥ तथाविध सगोत्रायामुत्पन्नस्य अरूढपतितापत्यं ब्राह्मण्यां यश्च शूद्रजः ॥ सगोत्रोढासुतश्चैवचंडालास्त्रय ईरित इत्यादिना बहुतरप्रत्यवायश्रवणात् ॥ तस्मादिदानीं विद्यमानगोत्रादित्यागेन नूतनगोत्रादिस्वीकारे हंसस्य गतिमुद्दिश्य स्वगतिश्चापि विस्मृता ॥ इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः बकः स्वजाति केवलमिति न्यायेन उभयभ्रष्टत्वापत्तेर्दुर्वारत्वात् ॥

**भाषांतर**—पुरोहितगोत्रांची कल्पना केल्यास एक ग्रामवासी सर्व वैश्यांचा एकच पुरोहित म्हणून त्या सर्वांची एक गोत्रत्वापत्ति येते, असें झाल्यास परस्परविवाह होणार नाहीं. आणि सर्वांनीं पुरोहितगोत्राचा आश्रय केल्यास एकपुरोहित वैश्यांचा परस्परविवाह होत नाहीं. म्हणून संस्कारमयूखांतील गोत्रप्रवरनिर्णय असलेल्या स्मृत्यर्थसारांत पुरोहिताच्या समान गोत्रांत उत्पन्न झालेली

कन्या विवाहास निषेध मानिली. स्वेच्छाचारानें गोत्राची कल्पना केल्यास ह्यांचें—वैश्यांचें—पूर्वींचें जें गोत्र आहे तें अज्ञात असल्यामुळें त्या गोत्रांतील पुरुषांशीं व समानगोत्रोत्पन्न कन्येशीं विवाह झाल्यास मोठा दोष उत्पन्न होईल. तेच सांगतातः—( अरूढ पतितापत्यं ) अरूढ पतिताचें अपत्य, ब्राह्मण-स्त्रीच्या ठिकाणीं शूद्रापासून झालेलें संतान, सगोत्र-कन्येपासून झालेली संतती, हे ३ चांडाल म्हणवितात. असा प्रत्यवाय आहे. त्याकरितां असलेलें गोत्र सोडून नूतन गोत्र स्वीकारल्यास पुढील न्याय सिद्ध होतो. बकपक्ष्यानें हंसाचें सुंदर गमन साधण्यास अभ्यासाचा प्रयत्न केला; आणि त्या प्रयत्नांत स्वगतीची विस्मृति झाली व हंसगमन-ही नष्ट झालें. नंतर बकपक्षी, इतो भ्रष्ट ततो भ्रष्ट होऊन निव्वळ लंगडूं लागला अशी परिस्थिति विवादि-वैश्यांची निःसंशय होणार आहे.

एवं विवादिना केनचित्कृतमिति मन्यमानाग्न्याधानविषये विद्यमानानुपपत्तिः प्रदर्श्यते ॥ एतावत्पर्यंतमुपन्यस्तप्रकारेण सूत्रोक्तगोत्रशाखाशून्यस्य वैदिकमंत्रैर्गोत्रशाखानिर्णयापेक्षाग्न्याधानमत्यंतानुपपन्नमित्येकानुपपत्तिः ।

२ अपरा च आपस्तंबश्रौतसूत्रे आधानप्रश्नेसू०॥ अपरेण ब्रह्मौदनिकं लोहिते चर्मण्यानडुहे प्राचीन ग्रीव उत्तर लोम्नि पात्रे वा निशायां ब्रह्मौदनं चतुश्शरावं निर्वपति ॥ देवस्यत्वेत्यनुद्रुत्य ब्रह्मणे प्राणाय जुष्टं निर्वपामीति प्रथमपानायेति द्वितीयं व्यानायेति तृतीयं ब्रह्मणे जुष्टमिति चतुर्थं तूष्णीं वा सर्वाणि चतुसृषूदपातेषु पचति ॥ न प्रक्षालयति न प्रस्रावयति क्षीरे भवतीत्येके जीवतंडुलमिव श्रप-

यतीति विज्ञायते दर्व्यां ब्रह्मौदनादुद्धृत्य ॥ प्रवे-धसे कवये मेध्या वचो वंदारुवृषभाय वृष्णे ॥ यतो भयमभयं तन्नो अस्त्ववदेवान्यजेहेडद्यानीति जुहो-त्यभि वा मंत्रयते चतुर्धा ब्रह्मौदनं व्युद्धृत्य प्रभूतेन सर्पिषा उपसिच्य कर्षन्नु छिद्रगूश्चतुभ्र्य आरुषे येभ्यो ऋत्विग्भ्य उपोहत्यपात्ताःप्रथमे पिंडा भवंत्य-प्रतिहताः पाणयः ॥

॥ अस्य रुद्रदत्तभाष्यं ॥ निशा चतुर्धा कृतायां रात्रेर्द्वितीयो भागः ॥ ब्राह्मणेभ्यो ओदनो ब्रह्मौदनः ॥ प्राणेभ्य ओदनो वा ब्रह्मणे प्राणयेति लिंगात् चतु-श्शरावं निर्वपाति ॥ चतुर्भिश्शरावैःपरिमितान्व्रीहीन्य-वान्वा निर्वपाति ॥ ब्रह्मौदनशब्दः कर्मनाम एतेनान्य-त्रापि ब्रह्मोदन चोदनातु नाम्ना धर्मातिदेशसिद्धो भवति ॥ भवति चात्र लिंगं तस्मिन् ब्रह्मौदनं पक्त्वा चतुरो ब्राह्मणान् भोजयेत् ॥ चतुश्शरावं वौदनमिति॥ एतत्सूत्रभाषाभ्यां अग्न्याधानकर्तुरौपासनाग्नौ अग्न्याधानकर्त्रा पाचितान्नस्य भक्षणं चतुर्णां ब्राह्म-णानां प्राप्तं एतदन्नं ब्राह्मणा भक्षितवंतो न वेत्यत्र विचारः। यदि ब्राह्मणा भक्षितवंतः तदा तेषां कथं ब्राह्मण्यं पूर्वोक्तरीत्या सावित्री प्रच्युतानां बहु-तरप्रायश्चित्तस्य ग्रंथकर्तृभिर्निर्णीतत्वादननुष्ठित तादृश-महत्प्रायाश्चित्तेनानेन पाचितैतत्स्पृष्टान्नस्य भक्षणे ब्राह्मणस्यैव लोपापत्तेः ॥ किं च अयाज्ययाजन प्रायश्चित्तप्राप्तेश्च ॥

भाषांतर—विवादि वैश्यांपैकीं कोणीं एकानें अग्न्याधान केलें

म्हणून कांहीं वैश्यांना अभिमान वाटत आहे. पण हें कोठपर्यंत शुद्ध आहे, ह्याचा विचार करूं. आतांपर्यंत झालेल्या प्रकरणावरून विचार केला तर सूत्रोक्त गोत्र आणि शाखा विरहित व्यक्तीचें वैदिकमंत्रानें केलेलें आधान गोत्र व शाखानिर्णयाकडे पाहिलें तर त्याहून पूर्व-गोत्र प्रवराहून अधिक अयोग्य म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. अग्न्याधानाची ही एक असंगति.

**दुसरी अशी**—आपस्तंबश्रौतसूत्रांत 'आपरेण ब्राह्मौदनिकं' या सूत्रवचनानें आणि " ब्रह्मौदनं पक्त्वा चतुरो ब्राह्मणान् भोजयेत् " या रुद्रदत्तभाष्यप्रमाणानें अग्न्याधान करणाऱ्याच्या औपासन अग्नीच्या ठिकाणीं आधानकर्त्यानें पक्व केलेलें ब्रह्मौदन अन्न ऋत्विग् असलेल्या चार ब्राह्मणांनीं भक्षण करणें योग्य आहे; पण तें अन्न ब्राह्मणांनीं खाल्लें किंवा नाहीं, ह्याचा विचार करावयाचा आहे. जर तें अन्न ब्राह्मणांनीं भक्षण केलें असलें तर ते ब्राह्मण कसले ? पूर्वोक्त रीतीनें वेदभ्रष्टांस ग्रंथकर्त्यानें निर्णय करून पुष्कळशीं प्रायश्चित्तें सांगितलीं. त्यावरून आधानाचा संभवच नाहीं. अथवा प्रायश्चित्तार्ह आधानकर्त्यानें पक्व व स्पर्श केलेलें अन्न ऋत्विक् ब्राह्मणांनीं भक्षण केल्यास त्यांच्या ब्राह्मण्याचाच लोप झाला पाहिजे. आणि अयाज्य याजनाची प्राय-श्चित्तप्राप्तिही आहे.

तथाहि ॥ हेमाद्रौ अयाज्ययाजनप्रायश्चित-माह ॥ अथाऽयाज्ययाजन तत्प्रतिग्रहप्रायश्चित्तमाह ॥ ॥ स्कांदे ॥ याजयेद्यजने योग्यान्विप्रो वृत्यर्थमाद-रात् ॥ अन्यथा दोषमाप्नोति न कर्मार्हो भवेदिह ॥ याजने अनर्हाः ॥ कूर्मपुराणे ॥ देवालकश्च गणको व्रात्यो दुःशीलवान् जनः ॥ शूद्रापतिः कर्महीनो लोके कुत्सितवृत्तिवान् ॥ महापातकिनः संगी क्षयरोगी

भगंदरी ॥ दुश्चर्मा शूद्रसेवी च भिषक् शूद्रान्नभक्षकः ॥ तूलादिसंग्रही मर्त्यो मर्यादाधातुकः सदा ॥ ग्रामदाही ग्रामणीश्च तथा दुस्संगवान् जनः । देवलकः जीवनार्थं ग्रामदेवार्चनकः ॥ गणकः ग्रामराष्ट्रेषु धनधान्यादिकं नित्यं लेखयन् यो वर्तते स गणकः ॥ व्रात्यः गायत्रीजपनाशकः ॥ तदेवाह मनुः ॥ नग्नो वेदपरित्यागी व्रात्यो गायत्रीनाशक इत्यादिना ॥ एतेषां यज्ञे याजने प्रायश्चित्तमाह वामनपुराणे ॥ अनर्हेषु च यागेषु विप्रो याजयते सकृत् ॥ प्रायश्चित्तविहीनश्चेत् भुवि पाषंडवान् भवेत् ॥ तदाह मनुः ॥ अनर्हणां च व्रात्यानां भिषजामाततायिनां ॥ यज्ञेषु ये याजयंति ते पाषंडा भवंत्यहो ॥ तेषां प्रायश्चित्तमाह कौर्मे ॥ अनर्हणामध्वरेषु ये ब्रह्मऋत्विगादयः ॥ तेषां पापविशुध्यर्थं षडब्दं कृच्छ्रमीरितं ॥ केशानां वपनं कृत्वा पुनः संस्कारमाचरेत् ॥ पंचगव्यं पिबेत्पश्चात् शुद्धो भवति नान्यथा इति हेमाद्रावुक्तत्वात् ॥ तस्मादेतद्ब्रह्मौदनभोक्तॄणां ऋत्विजामपरिशुद्धत्वप्राप्तेस्तैरनुष्ठितमाधानात्मकं कर्म दुष्टत्वादाधानमेव न भवति यदि तैर्ब्रह्मौदनं न भक्षितं तदापितत्कृतं कर्म अंगलोपादाधानमेव न भवति इत्युभयथापि तत्कृतं आधानं न भवति ॥

**भाषांतर**—अयाज्ययाजनप्रायश्चित्त म्हणजे यज्ञकर्म करण्याचा अधिकार ज्यास नाहीं त्याची यागादि क्रिया केल्यास प्रायश्चित्तावांचून शुद्धि होत नाहीं, असें हेमाद्रि ग्रंथांत म्हटलेलें आहे. तसेंच स्कंदपुराणांतही सांगतात. ब्राह्मणांनीं यागादि क्रिया करण्याचा

अधिकार ज्यास आहे, त्यानेंच यज्ञानुष्ठान करावें नाहीं तर कर्म करविणारा दोषी होतो असें कूर्मपुराणांत आहे. आपल्या उपजीविके-करितां देवपूजा करणारा व गांवांतील साहु सावकार लोकांचीं खातीं लिहून निर्वाह करणारा आणि वेदभ्रष्ट झालेला व शूद्र व वैद्य यांचें अन्न खाणारा हे सर्व प्रायश्चित्तावांचून वेदोक्त कर्मास अधिकारी होत नाहींत. मनुही सांगतो कीं, नग्न म्हणजे वेदाध्ययन सोडिलेला, व्रात्य म्हणजे गायत्रीजप न करणारा असा निषेध करून वामनपुराणांत यज्ञ करविणाऱ्यास प्रायश्चित्त सांगतात. यज्ञास अधिकारी नसलेला एक वेळ जरी यज्ञ करविल्यास प्रायश्चित्त न घेतां राहिला, तर जगांत पाखंडी म्हणून प्रसिद्ध होतो. ह्याकरितां कूर्मपुराण सांगतें, अयोग्याच्या यज्ञांत असणाऱ्या ब्राह्मणादिक ऋत्विजांनी स्वतःच्या पापशुद्ध्यर्थ सहा वर्षेंपर्यंत कृच्छ्र प्रायश्चित्त करावें; व केशवपन करून पुनः संस्कार करावा. नंतर पंचगव्य प्राशन केलें तर तो शुद्ध होतो, त्यावांचून शुद्धि नाहीं; असें हेमाद्रि ग्रंथांत आहे; त्याकरितां ब्रह्मौदनभक्षण करणाऱ्यास अशुचित्व सिद्ध असतां त्यांनीं केलेलें आधान कर्मदुष्ट म्हणून अयोग्य म्हणविलें जातें. जर ब्रह्मौदन भक्षण केलें नसेल तर आधानकर्म अंगलोप झाल्यानें न केल्यासारखेंच होय. तात्पर्य, दोन्ही पक्षानें आधान अशास्त्रच सिद्ध होत आहे.

यदि विवादि वैश्यानां वेदोक्तमंत्रैरुपनयनादिक-मपि पूर्वकालमारभ्य भवतीत्युच्यते तर्हि विवादः किमर्थं प्रवृत्तः पूर्वकालमारभ्य प्रवर्तमानेषु कर्मसु विषयेन कश्चिदप्याक्षिपति ॥ यथा ब्राह्मणजातीयस्य उपनयनकरणे वेदाध्ययने यज्ञादिकरणे च न कश्चि-दप्याक्षिपति ॥ न हि तथा प्रकृते अनाक्षेपः प्रकृत विदादिवैश्यानां वेदोक्तमंत्रैरुपनयनादिकरणे सर्वै-

**रपि आक्षेपकरणस्यैव दर्शनात् ॥ पूर्वकालमारभ्य प्रवर्तत इति वक्तुं न शक्यत एव ॥ किं च प्रकृत-विवादिवैश्यानां सर्वथा वेदोक्तकर्मरहितत्वेन प्रसिद्ध-सर्वदेशविद्यमानवैश्यैरपि विवाहादि संबंधस्य प्रत्यक्ष-सिध्दत्वादेतेषामपि विवादिवैश्यानां पूर्वं वेदोक्त-कर्माचरणं नासीदित्येवेति प्रत्यक्षसिद्धं ॥ न च मास्तु पूर्वकालानुष्ठानं इदानीमेव श्रेष्ठं वैदिक-कर्माभ्यत इति वाच्यं ॥**

**भाषांतर**—जर विवादि वैश्यांचे उपनयनादि संस्कार पूर्वीं-पासून वेदमंत्रांनींच होत आहेत, तर वाद कां उत्पन्न झाला; कारण पूर्वींपासून चालत आलेल्या कार्यास कोणी तरी आक्षेप करितो काय? जसें, ब्राह्मणजातीच्या वेदाध्ययन व यज्ञ आणि उपनयनादि संस्कार यांविषयीं आक्षेप केलेले कधीच दिसत नाहीं! पण सांप्रत वैश्यांच्या वेदोक्ताविषयी सर्वच आक्षेप करितात! ह्या सर्व प्रश्नांस उत्तर: वैश्यांचें वेदोक्त कर्म पूर्वींपासून होत आहे ही गोष्ट शक्य नाही; कारण सर्व देशांत प्रसिद्ध आहे की, आजपर्यंत वैश्यांचें विवाहादिक कार्य पुराणोक्त होतें. हल्लींच्या वैश्यांचेंही वेदोक्त कर्म पूर्वीं झालेलेंच नाहीं; हें प्रत्यक्ष सिद्ध आहे.

**तथा सति ब्राह्मणस्य विहितानां अध्ययनाध्या पनादीनां श्रेष्ठत्वात् अध्यापनादावपि प्रवृत्तिस्स्यात् ॥ धर्मार्थमध्यापने पुण्यविशेषसंभवात् ॥ ब्राह्मणकन्या-याः श्रेष्ठत्वादुद्वाहेऽपीच्छाऽस्यात् ॥ न चैतत्सर्व-मिष्टमेवेति वाच्यं स्वस्वविहितधर्मापेक्षया उत्तम-स्याप्यन्यधर्मस्यानुष्ठाने प्रत्यवायश्रवणात्—॥**

**भाषांतर**—पूर्वींपासून चालत आलेलें कार्य असो. आजपासूनच

वेदोक्तकर्म श्रेष्ठ आहे, म्हणून वेदाध्ययन व यज्ञादि वैदिक कर्मे करण्यास प्रारंभ करतों, असें अगदीं म्हणूं नका. असें झाल्यास, ब्राह्मणांना विहित असलेलें अध्ययन व अध्यापन हेंही श्रेष्ठ आहे, म्हणून अध्यापनाविषयींही प्रवृत्ति होईल. कारण धर्मार्थ केलेल्या अध्यापनामध्यें विशेष पुण्य आहे, तसेंच ब्राह्मणकन्याही श्रेष्ठ म्हणून तिच्या विवाहाविषयीं इच्छा होईल. ह्या सर्व गोष्टी आम्हांस इष्टच आहेत, हें म्हणणें योग्य नाहीं. स्वतःला विहित असलेल्या धर्मापेक्षां परधर्म श्रेष्ठ म्हणून आचरिला तर प्रत्यवाय आहे.

तथा हि ॥ आपस्तंबधर्मसूत्रे सर्ववर्णानां स्वधर्मानुष्ठाने परमपरिमितं सुखं ततः परिवृत्तौ कर्मफलविशेषेण जातिं रूपं वर्णं बलं मेधां प्रज्ञां द्रव्याणि धर्मानुष्ठानमिति प्रतिपद्यते तच्चक्रवदुभयोर्लोकयोस्सुख एव वर्तत इति ॥ एवं भगवद्गीतायां श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ॥ स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावह इत्युक्तेश्च ॥ एवं येनास्य पितरो याता येन याताः पितामहाः ॥ तेन यायात्सतां मार्गं नातिवर्तेत्सतां गतिं ॥ एवं यस्मिन् देशे य आचारः पारंपर्यक्रमागतः ॥ वर्णानां सांतरालानां स सदाचार उच्यते इति मनुस्मृत्यादिवचनाच्च ॥ एवं ग्रामधर्मा जातिधर्मा देशधर्माः कुलोद्भवाः ॥ परिग्राह्या नृभिस्सर्वैः नैव तान् लंघयेन्मुने ॥ इत्युक्तत्वात् पूर्वकुलाचारस्यैव मुख्यत्वं सिध्यतीति ॥ उत्कृष्टपरधर्मापेक्षया नीचोपि स्वधर्म एव श्रेयान् ॥ श्रूयतेऽपि महाभारते—धर्मव्याधोपाख्याने धर्मव्याधस्य स्वजातिविहितो नीच-

कर्मानुष्ठानेऽपि तस्य स्वधर्मत्वात् मातापितृसेवया च ब्राह्मणापेक्षया प्राप्तं ज्ञानाधिक्यं ॥ स्वोचित-मातापितृशुश्रूषात्यागात् ब्राह्मणस्य धर्मव्याधात् ज्ञानोपदेश इति ॥ अतः प्रकृतविवादिवैश्याना-मपि पितृपितामहादिवंशपरंपरया आगतरीत्या षोडशकर्माचरणस्यैव श्रेयस्साधनत्वं ॥ पितृपिता-महादिप्रभृतिभिरननुष्ठितवेदमंत्रोच्चारणपूर्वककर्मा-चरणस्य प्रत्यवायजनकत्वद्वारा अनिष्टजनकत्वमेव संभवतीति सिध्दम् ॥

**भाषांतर**—आपस्तंबधर्मसूत्रांत सर्व वर्णांनी स्वतःचा धर्म आचरिल्यास परमसुखप्राप्ति आहे, कर्माचे विशेष फल म्हणजे जाति, रूप, वर्ण, बल, बुद्धि, प्रजा, द्रव्य, हींच समजलीं जातात; आणि चक्राप्रमाणें, उभय (लोकांत स्वर्ग व मृत्यु) सुखच आहे असेंच भगव-द्गीताही 'श्रेयान् स्वधर्मो विगुणो' आपल्या धर्मांत वैगुण्य असलें तरी परकीय धर्माचरण केल्यापेक्षां स्वधर्माचरण करण्यामध्येंच अत्यंत कल्याण आहे. परंतु दुसऱ्यांचा धर्म श्रेष्ठ म्हणून स्वधर्माचा त्याग केल्यास नरकादि दुःखांची प्राप्ति आहे; असें स्पष्ट सांगितलें. पित्यानें जो मार्ग स्वीकारला; आणि पितामहादिकांनी ज्या मार्गाचें अवलबन केलेलें आहे, आपणही त्याच मार्गानें वर्तन करावें. ज्या देशामध्यें परंपरेनें आलेला आचार ज्यानें निरंतर चालविला असेल; तोच सदा-चारी म्हणविला जातो, असें मनुस्मृतीनें सांगितलें. मनुष्यांनीं जाति-धर्म, ग्रामधर्म व देशधर्म जे कुलपरंपरेनें होत आले, तेच आचरणांत आणावे; पण त्यांचें उल्लंघन करूं नये. ह्या प्रमाणानेंही पूर्व कुलाचारच मुख्य सिद्ध होतो. परकीयांचा उत्कृष्ट धर्म आचरिल्यापेक्षां त्याहून परकीयधर्माहून कांहीं गुणानें कमी असलेल्या धर्माचें आचरण करण्यांतच

श्रेय आहे. असें महाभारतांत ऐकण्यांत आहे कीं, धर्मव्याध आख्याना-मध्यें स्वजातीला विहित असलेलें नीच कर्मानुष्ठानच धर्मव्याधास उत्कृष्ट वाटलें ! कारण मातेच्या आणि पित्याच्या सेवेनेंच ब्राह्मणा-पेक्षां त्यास अधिक ज्ञान प्राप्त झालें ! म्हणूनच मातेची व पित्याची शुश्रूषा त्याग करणाऱ्या ब्राह्मणास धर्मव्याधापासून ज्ञानोपदेश झाला ! ह्याकारितां प्रकृत विवादि वैश्यांनाही पितृपितामहादिकांच्या वंशपरंपरेनें आलेल्या षोडश कर्माचरण करण्यांतच कल्याण आहे. पितृपिता-महादिकांनीं आचरण न केलेलें वेदोक्त कर्म केल्यास दोषानें उत्पन्न होणारी दुःखप्राप्तीच संभवते, हें निश्चित आहे.

एवमेव श्रीमद्रामायणे उत्तरकांडे श्रीरामराज्य-भारकाले शंबूक इति कश्चिच्छूद्रः स्वकुलागतधर्मं परित्यज्य ब्राह्मणोचितकर्मणः श्रेष्ठत्वात्तत्करणं श्रेय-स्साधनमिति मत्वा स्नानसंध्यादिरूपतपोनिष्ठो बभूव ॥ ततस्तदनुष्ठितविरुद्धधर्मदोषेण कस्यचि-द्ब्राह्मणस्य षोडशवार्षिकः पुत्रः अकाले मरणमाप स ब्राह्मणः मृतपुत्रं श्रीरामचंद्रगृहद्वारमानीय हे राजन् तव दुर्णयेन मत्पुत्रः अकाले आकस्मिकीं मृतिं प्राप तव दुर्णयो नास्ति चेत् मत्पुत्रस्य एवं मृत्युर्न-भवेदेव तस्मादेवं मृतपुत्रं त्वद्गृहद्वारे निक्षिप्तवान-स्मि तव दुर्णयं ज्ञात्वा तत्परिहृत्य एनं जीवय नोचे-त्वां शप्स्यामीत्युक्तवान् ततश्च श्रीरामचंद्रः पुष्प-कमारुह्यस्वदेशे सर्वत्रापि अधर्मप्रवृत्तिं मृगयन् कति-चित्कालेन शंबूकमाससाद शंबूकवृत्तांतं सर्वं तन्मुखात् ज्ञात्वा अयं शूद्रः स्वकुलाचारविरुद्धे तपसि वर्तते तस्मादेनं हनिष्यामीति खड्गमुद्धृत्य तं निज-

**घान ॥ तत्क्षण एव ब्राह्मणपुत्रस्य जीवो बभूवेति उपाख्यानस्य स्फुटत्वात् स्वस्य कुलक्रमागतधर्मत्यागपूर्वकान्यधर्माचरणस्य अतीवाधर्मत्वात् ॥**

**भाषांतर**—ह्याप्रमाणें ( श्रीमद्रामायणांतील उत्तर-कांडांत ) श्रीरामचंद्राचा राज्यकारभार चालू असतां शंबूक म्हणून कोणी एक शूद्र आपल्या कुलपरंपरेनें आलेल्या धर्माचा परित्याग करून ब्राह्मणास योग्य असलेल्या कर्माचें आचरण श्रेष्ठ समजून स्नानसंध्यादि तप आचरूं लागला. नंतर विरुद्ध असलेल्या धर्मदोषानें कोणा एका ब्राह्मणाचा १६ वर्षांचा मुलगा अकाली मरण पावला ! तो ब्राह्मण मृतपुत्रास श्रीरामचंद्राच्या गृहाप्रत आणून हे राजा, तुझ्या दुर्वर्तनानें माझा पुत्र अकालीं अकस्मात् मरण पावला! तुझें दुष्ट आचरण नसतें तर माझ्या पुत्राचा असा मृत्यु झाला नसता, ह्याकरितां मृत पुत्रास तुझ्या गृहद्वाराचे ठिकाणीं मीं आणून टाकिला आहे. तूं आपल्या दुर्वर्तनाचा विचार कर आणि त्याचा परिहार करून ह्यास सजीव कर ! नसतां तुला शाप देईन. असें बोलल्यानंतर श्रीरामचंद्र पुष्पक विमानांत आरूढ होऊन आपल्या देशांत सर्व ठिकाणीं अधर्मप्रवृत्तीचा शोध करीत कांहीं दिवसांनीं शंबूकाच्या समीप आले ! शंबूकाचा सर्व वृत्तांत त्याच्याच मुखानें जाणून हा शूद्र स्वकुलाचारास विरुद्ध असलेलें तप करीत आहे ! ह्याकरितां ह्यास मी मारणार म्हणून खड्ग काढून श्रीरामचंद्रानें त्यास जीवासह मारिलें. या क्षणींच ब्राह्मणपुत्र सजीव झाला. पूर्व इतिहास स्पष्ट आहे. आपल्या कुलपरंपरेनें आलेल्या आचाराचा परित्याग करून परधर्माचें अवलंबन करणें हा अधर्म आहे.

**इदमत्र बोध्यं ॥ पूर्वं युगांतरे स्थितजातीयानां शुध्द्रानां वैश्यत्वेन व्यवहीयमाणानां प्रायशो नष्ट-**

त्वात् ।। एके च न स्थिताः तेपि शूद्रादिनिषिध्द-
कर्माचरणमाश्रिताः संकीर्णाः इदानींतन वैश्यत्वेन
व्यवहारविषयापेक्षया अतिनीचवृत्तयो बभूवुः ततश्च
तदुद्दिधीर्षया भास्कराचार्य इति कश्चिद्दैवात्संभूत-
स्ततश्च तदानींतनवृत्तांतादिकं संगृह्य पूर्वाचार्याज्ञया
कन्यकापुराणमिति प्रकटयित्वा तदानींतन वैश्यानां
यथाशक्यं दुराचारादिकं निष्कास्य कानिचि-
ल्लौकिक गोत्राणि तत्तद्वंशानुरोधेन यथा असंकीर्णं
भवे तथा कल्पयित्वा पौराणिकमंत्रैः षोडशकर्माणि
विधाय व्यवस्थां कृत्वोद्धृतवान् ।। एतत्सर्वं
इदानीमुपलभ्यमान अतिप्राचीनकन्यकापुराणवैश्य-
कमलाकरादिग्रंथादिभिर्विज्ञायते ।। एतद्रीतेः परि-
त्यागे एतेषां गत्यंतराभावात्तद्रीत्यैव वर्तितव्यमिति।।
एतत्सर्वं ज्ञात्वैव कलौ क्षत्रियवैश्यजात्योः स्वरूपेणो-
च्छिन्नत्वादिति माधवाचार्यैरुक्तं एतदर्थानुसारेणैव ।।
ब्रह्मवैवर्ते वैश्याः कलौ नहि भवंति कुलादियुक्ताः
ये वा भवंति न तेषु वृषः कदाचित् ।। शूद्राणि वृत्तय
इमे द्विजदेवनिंद्या विप्रद्विपः परमदारुणबुद्धयश्च ।।
एवं ब्राह्मणाः क्षत्रियाः वैश्याः शूद्रवर्णास्त्रयो द्विजाः।।
युगे युगे स्थितास्सर्वे कलावाद्यंतयोः स्थितिः ।।
एवं मत्स्यपुराणे नाधीय्यंते कलौ वेदान्न यजंते द्विजा-
तयः ।। उत्सीदंति तथा चैव वैश्यैस्साकं तु क्षत्रिय
इति ।। एवं अत्रिस्मृतावपि ।। नंदांतं क्षत्रियकुलं
वेदवैदिकसंयुतं भविष्यति ततः शूद्रप्रायं वैश्यकुलं
तथा ।। इत्यादि ब्राह्मणोदाहृतस्मृत्यादि वचनानां

**सत्वात् पूर्वस्थितशुद्धवैश्यजातिरेव व्युच्छिन्ना बभूवेत्येव वक्तुं शक्यते ॥**

**भाषांतर**—यांत हें तत्त्व आहे; पूर्वीं अन्य युगांत शुद्ध-वैश्य या नांवानें व्यवहार असलेले शुद्ध जातींत उत्पन्न झालेले वैश्य बहुतकरून नष्टच आहेत! जे कोणी असतील तेही शूद्राप्रमाणें विरुद्ध आचरण करीत वर्ण-संकर पावलेले, हल्लींच्या वैश्यव्यवहारापेक्षांही अति नीच वर्तन करणारे असे होऊन गेले. (तेव्हां त्यांचा उद्धार करण्याच्या इच्छेनें कोणी भास्कराचार्य म्हणून दैवयोगानें उत्पन्न झाले! नंतर त्या वेळची परिस्थिति पाहून आणि पूर्व आचार्यांच्या आज्ञेनें कन्यकापुराण प्रगट करून त्यावेळीं असलेल्या वैश्यांचें शक्य तेवढें दुराचारादिक काढून वर्णसंकर न होईल अशीं कित्येक लौकिक गोत्रें त्यांच्या वंशाला अनुसरूनच कल्पिलीं आणि पौराणिक मंत्रांनीं षोडशकर्म करून योग्य व्यवस्थेनें वैश्यांचा उद्धार केला.) हें सर्व या वेळेस उपलब्ध असलेलें आणि अति पुरातन कन्यकापुराण व वैश्यकमलाकरादि ग्रंथांवरून स्पष्ट कळतें कीं, हा मार्ग सोडिल्यानंतर दुसरा मार्गच नाहीं; म्हणून ह्या पूर्व पद्धतीनेंच वैश्यांनीं आपलें वर्तन ठेविलें पाहिजे.) हें सर्व जाणूनच कलीमध्यें क्षत्रिय व वैश्य स्वरूपतः उच्छिन्न म्हणून माधवाचार्यानें जें सांगितलें तें या अर्थाला अनुसरूनच आहे. तसेंच ब्रह्मवैवर्त पुराणांत ( वैश्याः कलौ न भवंति) ह्यापासून ( प्रायं वैश्यकुलंतथा ) या श्लोकापर्यंत ब्राह्मणांनीं जीं प्रमाणें उच्चारलीं तीं सर्व शुद्धवैश्यपर मानून शुद्धजाति व्युच्छिन्न झाली म्हणणेंच शक्य आहे.

**॥ न च पूर्वे ब्राह्मणाः एतेषां कृत्रिमगोत्राणि कल्पयित्वा वेदोक्तकर्माणि त्याजयित्वा पौराणिक-**

मंत्रादिभिः षोडशकर्माणि कारयामासुरिति वाच्यं ॥ न हि कश्चिन्मूढोपि अन्यप्रेरणया स्वधृतरांकव-कौशेयादिकमपहाय जीर्णशणवल्कलादिकं परि-धत्ते तथा यद्येषां वेदवैदिककर्मानुष्ठातृत्वं स्थितं चेति ब्राह्मणवंचनया तत्त्यागस्यासंभावितत्वात् ॥ तत्त्या-जने वा ब्राह्मणानां प्रयोजनाभावात् ॥ तस्माद्वेद-वैदिककर्मानुष्ठानादिकं पूर्वमपि नासीदित्येव सिध्य-ति ॥ तस्मादेतेषां पूर्वकालमारभ्य वंशपारंपर्येण विद्यमानरीत्या सकलधर्मानुष्ठानमेव श्रेयः साधनं भवति ॥ यदिमे वेदोक्तकर्माणि वेदमंत्रैः कुर्युः तदा एतेषां महान्प्रत्यवाय एव भवतीति सिद्धं ॥

**भाषांतर**—पूर्वी ब्राह्मणांनीं कृत्रिम गोत्रांची कल्पना करून वैश्यांचीं वेदोक्त कर्मे सोडविलीं; आणि पौराणिक मंत्रांनीं षोडश-कर्मे करविलीं! असा जो आपला गैरसमज झाला, तो सर्वथा चुकीचा आहे; कारण असा कोणी मूर्ख नाहीं की, जो दुसऱ्याच्या सांगण्यावरून आपल्या अंगावर असलेली शाल आणि पितांबर टाकून जीर्ण झालेले व सल्मापासून तयार केलेलें वल्कल धारण करील. म्हणूनच यांचा वैदिक धर्माचार ब्राह्मणांनीं फसविला म्हणणें संभवत नाहीं. कारण वैदिक कर्म सोडविण्यांत ब्राह्मणांचें प्रयोजनही कांहीं नाहीं. त्या-करितां वेदोक्त आचार पूर्वी नव्हता हेंच सिद्ध होतें. पूर्वकालापासून परंपरेनें आलेल्या धर्माचें आचरण करणेंच हितावह आहे. जर हे ब्राह्मण वेदोक्तकर्म वेदमंत्रांनीं करवितील तर त्यास मोठा प्रत्यवायच सिद्ध होतो.

॥ यदि च वयं वैश्या इति प्रसिद्धिं प्राप्ताः वैश्यानां वेदवैदिककर्माधिकारित्वं शास्त्रे प्रसिध्दं तद-

स्माकं नास्तीति खिद्यामहे इति चेत् खेदस्य नाय-मवसरः॥ युष्मत्सदृशाः ब्राह्मणा अपि बहवः संति॥ ब्राह्मणानां अध्ययनाध्यापनयज्ञयाजनदानप्रतिग्रहणादिरूपं षट्कर्माधिकारस्य सकलश्रुतिस्मृतिपुराणेषु प्रसिद्धत्वेपि पश्चिमदेशे ब्राह्मणेषु केचनकोप्पलु नामकाः केचन चतुर्विंशति नामानः केचन सकलत्र-पुरवासिनामानः केचन शिष्यवर्गनामानः एवमादयो अनेक भेदास्संति तेषां अद्यापि वेदोक्तमंत्रैरेव उपनयनादिकं अध्ययनादिकं च अनुभवासिद्धं सर्वेपि ब्राह्मणाः तेषां गृहे वेदोक्तकर्माण्येव कारयंति एतेषां गोत्रशाखाश्च प्रसिध्दाः ॥ परंतु एतेषां अध्यापन-याजनप्रतिगृहाणीति त्रीणि कर्माणि न संति एतेभ्यः कश्चिदपि किंचिदपि दानं न ददाति॥ एभ्यः कश्चि-दपि वेदमंत्रं नाधीते किं च एतेषां इतरब्राह्मणैस्सह पंक्तिभोजनादिकमपि नास्ति पृथक् तिर्यक्पंक्ता-वेव भोजनादिकं वर्तते॥ एतेषां गृहेषु तद्बंधुजना एव भुंजते अन्ये केपि ब्राह्मणा न भुंजते इत्थं प्रसिध्दिरधुनापि वर्तते ॥ एवं वर्तने किम्मानं वक्तुं शक्यं ॥ यदा एतेषां येन कारणेन अध्यापनयाजन-प्रतिग्रहणाधिकारःसहपंक्तिभोजनादिश्च प्रच्युतः तत्र ज्ञायते चेदपि पूर्वाचारानुसारेणैव इमे वर्तंते ॥ एवमेव सर्वेषामपि यत्किंचिध्दर्मस्य शास्त्रमात्र सिध्दत्वेपि प्रत्यक्ष सिध्दाचाराभावान्नानुष्ठानं तन्नानुष्ठेयमेव ॥

**भाषांतर**—जर वैश्य म्हणून आम्हीं प्रसिद्ध आहोंत, आणि वैश्यांना वेदोक्तकर्माचा अधिकार शास्त्रप्रसिद्ध आहे; पण आम्हांस

कां नाहीं म्हणून खेद करीत आहों. असें आपलें मत असेल तर ही वेळ खेद करण्याची नाहीं, तुमच्यासारखे ब्राह्मणही पुष्कळ आहेत. ब्राह्मणांना अध्ययन, अध्यापन, यज्ञ, याजन, दान, प्रतिग्रह, ह्या षट्कर्मांचा अधिकार सर्व श्रुतिस्मृतिपुराणादि ग्रंथांत प्रसिद्ध असला तरी पश्चिम देशांत ब्राह्मणांमध्यें कित्येक कोप्पल नांवाचे, कित्येक चतुर्विंशति नांवाचे, कित्येक सकलत्रपुरवासिना, कित्येक शिष्य-वर्ग नांवाचे असे पुष्कळ भेद आहेत. त्यांचें अद्यापि वेदोक्तमंत्रांनींच उपनयन, अध्ययन, अनुभवसिद्ध आहे. सर्व ब्राह्मण त्यांच्या गृहांचे ठिकाणीं वेदोक्तकर्मच करितात; परंतु ह्यांना अध्यापन, याजन' प्रति-ग्रह अशीं तीन कर्मे नाहींत. ह्यांस कोणी दान देत नाहींत. ह्यांच्या-पासून वेदाचें अध्ययनही कोणी करीत नाहीं. व इतर ब्राह्मणांसह ह्यांचा भोजनाविषयीं पंक्तिव्यवहारही नाहीं. त्यांच्या गृहांचे ठिकाणीं त्यांच्या बंधुजनांचेच सहपंक्तीस भोजन होतें. इतर कोणीही ब्राह्मण ह्यांच्याशीं पंक्तीभोजन करीत नाहींत. अशी अद्यापि प्रसिद्धी आहे. ह्यांच्या ह्या व्यवहारास कोण प्रमाण सांगूं शकेल ? जेव्हां ह्यांचें अध्या-पन, याजन, प्रतिग्रह, पंक्तिभोजनादिक वर्ज्य झालें असेल तें कळत नसलें तरी हे पूर्वाचारास अनुसरूनच आहेत. असेंच सर्वांस. धर्मशास्त्रास विरुद्ध असला तरी प्रत्यक्ष नसलेला जो व्यवहार तो कधींही आचरणांत आणूं नये.

यदपि केनचिदुक्तं वैश्यानां इदानीं विद्यमान-पौराणिकमंत्रेषु कानिचिदशुभकर्मादिषु विनियुक्त-मंत्राणि पूर्वं प्रयोगे पठ्यंत इति तदप्यसंगतमेव । मंत्राणां पूर्वकर्माणि अपरकर्माणि च विनियोगसत्वे का हानिः॥ यथा वेदमंत्रैःकर्म कुर्वतां ब्राह्मणानामपि अप-नश्शोशुचदघमित्यादि मंत्राणि आश्वलायनानां गर्भा-

धानारव्यकर्मणि विनियुक्तानि ।। तान्येव बादीनां अंत्येष्टौ अपरकर्मणि विनियुक्तानि ।। तावतापि देवताप्रकाशनकर्तृस्तवनादि पराणां मंत्राणां यत्र कुत्रचिद्वा विनियोगोस्तु का हानिः ।। अथवा क्वचित् क्वचित्स्स्वालित्य सत्वेपि महतां समीपे विज्ञाप्य तत्समीकर्तव्यं ।। तदर्थं प्रकारांतरानुसरणे महान्प्रत्यवाय एव ।। तस्मात् एते विवादि वैश्या अपि बहुकालादारभ्य स्वानुष्ठानविषयत्वेन सकलजनप्रत्यक्षसिद्धरीत्यैव षोडशकर्माण्याचरंतः देवब्राह्मणभक्तियुक्तास्संतस्थिताश्चेत् ब्राह्मणादयः स्वधर्मानुष्ठाने न यां गीतं प्राप्नुवंति।। श्रेयोवंतश्च भविष्यंति।। तदतिक्रमणेन वेदमंत्रैः यदि कर्माणि कुर्युस्तदा महान् प्रत्यवाय एव भविष्यति ।। एवं एतेषां विवादि वैश्यानां वेदोक्तमंत्रैर्वैदिककर्मानुष्ठानस्य निषिध्दत्वात् एतेषां येवा धनाशया वंचनादिना वा वेदमंत्रैर्वेदोक्तकर्माणि कारयिष्यंति तेपि अयाज्ययाजनादिना प्रत्यवायिनो भूत्वा कर्मकर्तृभिः सह बहिष्कार्याश्च भवेयुः ।। तस्मादेते विवादिवैश्याः बहुकालमारभ्य एतत्पितृपितामहादिभिरनुष्ठितरीत्या सकलकर्माणि कुर्वंतः संप्रदायागतसन्मार्गानुसरणेन श्रेयोवंतो भूयासुरिति शिवं प्रार्थयामहे ।। श्लोक ।। वंवशक्रमादागत संप्रदायमाश्रित्य कर्माणि सदाऽचरंतः सर्वे जनाः श्रीशिवसत्प्रासादात् श्रेयांसि भूयांसि भजंतु नित्यं।।

।। श्रीरस्तु ।।

**भाषांतर**—वैश्यांच्या षोडशकर्मांबद्दल हल्लीं चालू असलेल्या

पौराणिकमंत्रांपैकीं कांहीं जे मंत्र अशुभ कर्मांमध्यें विनियोग केले आहेत, तेच मंत्र शुभकर्मांतही पठण केले जातात, हें म्हणणें योग्य नाहीं. कारण, मंत्राचा विनियोग पूर्वकर्मांत केला काय, आणि अपरकर्मांत केला काय, बाध म्हणून मुळींच नाहीं. जसें, वेदमंत्रानें कर्म करणाऱ्या ब्राह्मणालाही 'अपनश्शोशुचदघं' इत्यादिक जे मंत्र आश्वलायनांच्या गर्भाधानसंस्कारांत म्हटले जाणारे आहेत तेच, आपस्तंबांच्या अंत्येष्टीकर्मांत उच्चारतात; म्हणून काय बिघडलें? तात्पर्य, देवतेला प्रसिद्ध करणाऱ्या आणि स्तवन करणाऱ्या मंत्रांचा विनियोग कोठेंही असो; पण हानि नाहीं. हें मात्र खरें आहे कीं, व्यत्यास होणाऱ्या मंत्रांची कर्मांमध्यें योजना कर्तव्य असल्यास मोठ्यांच्या जवळ ते मंत्र समान करून घ्यावे; परंतु मंत्रांचा फेरफार करणें हा मोठा दोष आहे. विवादि वैश्यही बऱ्याच दिवसांपासून आपल्या कर्मानुष्ठानाविषयीं सर्व जनप्रसिद्ध असलेल्या षोडशकर्मांचें आचरण करीत देव-ब्राह्मणांच्या संमतीनें राहातील तर ब्राह्मण जसे स्वधर्माचरणानें ज्या गतीला जातील त्या रुद्रतीला प्राप्त होतील आणि सुखी राहातील. ह्याचें—पूर्वाचाराचें—उल्लंघन करून वेदमंत्रानें वेदोक्तकर्म करतील तर मोठा दोष उत्पन्न होईल! ह्याप्रमाणें ह्या वैश्यांच्या वेदोक्तमंत्रानें कर्माचा निषेध आहे. ह्याचें उल्लंघन करून वेदोक्तकर्म निषिद्ध असतां जे कोणी द्रव्याच्या आशेनें फसून वैश्यांचें वेदोक्तकर्म करतील तेही अयाज्ययाजनाप्रमाणें प्रायश्चित्ती होऊन कर्म करणाऱ्यासह बहिष्कृतास पात्र होतात! ह्याकरितां विवादि वैश्यही पुष्कळ दिवसांपासून आलेला वाडवडिलांनीं आचरण केलेला मार्गच धरून सांप्रदायाप्रमाणें कर्म करीत सुखी होवोत! म्हणून ईश्वराजवळ प्रार्थना करितात.

॥ श्लोकः ॥ ( वंवशक्रमा ) वंशपरंपरेनें आलेल्या सांप्रदायास अनुसरून सदाचरण करणारे सर्व लोक शंकराच्या कृपाकटाक्षतेनें नेहमीं पुष्कळ- शा कल्याणाप्रत प्राप्त होवोत ॥

॥ श्रीरस्तु ॥

॥ शके १८४७ क्रोधनाम संवत्सर माघ शुद्ध ७ बुधवार श्रीलक्ष्मीव्यंकटेशार्पणमस्तु ॥

समाप्त.

**अनंत सखाराम गोखले** यांनी विजय छापखाना ५७० शनवार पेठ,
पुणे येथे छापिलें आणि **यज्ञेश्वरशास्त्री देवणीकर**, मुक्काम बीदर
( निजामस्टेट ) यांनीं प्रसिद्ध केलें.